# अमृत कुंभ




वर्ष ८ • अंक ४ • ऑक्टोबर-नोव्हेंबर १४ • मूल्य रु. १०/-

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच "मन्मनाभव।''

# अमृत कुंभ

वर्ष ८ । अंक ४ । ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१४

## मुखपृष्ठाविषयी

*कलियुगाच्या अंतिम पर्वात सन १९३६ मध्ये जेव्हा दीपराज 'शिव' परमात्म्याचे या सृष्टीवर अवतरण झाले, तेव्हाच खऱ्या अर्थी दिवाळीचा प्रारंभ झाला. परमात्मा विश्वातील लाखो आत्म्यांची ज्योति जागृत करतात, म्हणूनच दिवाळी या सणाला दीपोत्सव असेही म्हटले जाते. याचेच प्रतीक शिव मंदिरात दीपस्तंभाच्या रूपाने पहायला मिळते. दीपस्तंभात वरती एक मोठा दीपक असतो, तो दीपराज परमात्म्याचे प्रतीक आहे व त्याच्या खाली असलेले अनेक दीपक हे आत्म्यांचे प्रतीक आहे.*

*दीपराज परमात्मा ज्ञान मुरलीद्वारे हेच सांगतात की 'देहसहित देहाचे सर्व संबंध विसरून, स्वतःला आत्मा समजा व माझी (शिवपित्याची) प्रेमपूर्वक आठवण करा म्हणजे तुम्ही पावन बनाल तसेच तुमच्यात दैवी गुणांची धारणा होईल. फलस्वरूप तुम्ही अतींद्रिय सुखाने भरपूर व्हाल.' हाच भाव मुखपृष्ठावर अनारच्या आतिशबाजीद्वारे दर्शविण्यात आला आहे. जसे 'अनार' लावताच त्यातून विविध रंगछटा पसरतात व बघणाऱ्यांना नेत्रसुख देतात, तसेच योगयुक्त आत्मे सर्व गुणांनी भरपूर असल्याने त्यांच्या चलन व चेहऱ्याद्वारे जणू दिव्य गुणांची उधळण होत असते फलस्वरूप त्यांच्या वृत्ती-दृष्टी व कृतीद्वारे फार मोठी सेवा सहज होत असते. आपणही आपली स्थिती अशीच बनवू या.*

***अशा मंगलमय दीपोत्सवाच्या तसेच नववर्षाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!***

*-- प्रकाशक, अमृतकुंभ.*

**वार्षिक वर्गणी रु. ६०/-**
**अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/-**
**आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** www.amrutkumbh.com

## -- अंतरंग --


- दिवाळी अर्थात दीपोत्सव — २
- अतींद्रिय सुख काय आहे व ते कसे मिळू शकते? — ५
- ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था... — ८
- वर्तमानसमयी नैतिक मूल्यांची आवश्यकता — ११
- आपल्या आंतर्आत्म्यात न्यायमंदिराची स्थापना करा — १३
- तुझ्या मुरलीचे वेड मज लागले (अनुभव) — १५
- सचित्र सेवावृत्त — १७
- आत्म्याचा अंत समयीचा संघर्ष — २१
- माझी गीता माऊली, देई कल्पवृक्षाची सावली — २४
- वर्णमालेत गवसले जीवनमर्म — २७
- हीच सणाची रीत खरी (कविता) — २८
- संगमयुगी विद्यार्थ्यांचे मार्क्स् (कविता) — २९
- पाना था सो पा लिया (अनुभव) — ३०
- सचित्र सेवावृत्त — ३३


**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail :info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** बी.के.गोदावरी,
प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्,
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के.गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु.शिवाजी चौधरी.

संगणक अक्षरजुळणी : कु.मनिषा गोवळकर, ८ श्रीसदिच्छा सोसायटी, मीठ बंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.

संपादकीय..

# दिवाळी अर्थात दीपोत्सव

दिवाळीचा सण भारतात सर्वत्र मोठ्या हर्ष-उल्हासाने साजरा केला जातो. परंतु लोक हे मर्म जाणत नाहीत की नरकासुर व बळीचा अंत अर्थात असुरत्वाचा पराजय व देवत्वाचा विजय यांचा हा स्मरणोत्सव आहे. दिवाळी साजरी करताना लोक केवळ आपले घर-आंगण, गल्ली-बोळ येथील सफाई करून तेथे रोषणाई करतात. मात्र ते आपल्या मनातील अज्ञान अंधःकार दूर करण्यासाठी, अंतर्मनात ज्ञानज्योती जागविण्याचा पुरुषार्थ करीत नाहीत. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे सहा दिवसांकरिता (वसुबारस, धनत्रयोदशी, नर्कचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा व भाऊबीज) दिवाळी येते आणि जाते. परंतु अंतर्मनातील अंधःकार जसाचा तसाच राहतो. उलट दरवर्षी तो वाढतच जातो. **त्यामुळे आत्मदीप जागविल्याशिवाय दिवाळी ही निरर्थक आहे. जगातील सर्व दुःखाचे मूळ कारण आहे, आपल्या सत्य-स्वरूपाचे अज्ञान. दिवाळीत दीप प्रज्वलनाचा अर्थ आहे, आपल्या जीवनात ज्ञानप्रकाश पसरविणे तसेच दुसऱ्यांना ज्ञानमय जीवन जगण्याची प्रेरणा देणे** परंतु प्रत्यक्षात तसे होत नाही. केवळ एक परंपरा म्हणून आपण दिवाळीचा सण साजरा करतो. या अनुषंगाने स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील एक छोटासा प्रसंग नमूद करावासा वाटतो.

स्वामी विवेकानंद विश्वभ्रमण करत असताना एकदा त्यांची भेट जपानमधील एका विद्वानाशी झाली असता, त्याने स्वामीजींना विचारले, 'भारतात गीता, रामायण, वेद, उपनिषद, इत्यादी ग्रंथातून इतके उच्च ज्ञान उपलब्ध असूनही भारतवासी परतंत्र व दुर्बल का बनले आहेत? तेव्हा स्वामीजींनी उत्तर दिले, 'समजा एखाद्याकडे सर्वश्रेष्ठ व शक्तिशाली बंदूक उपलब्ध आहे परंतु तिचा वापर त्याला करता येत नसेल तर तो स्वतःचे रक्षण करू शकणार नाही. त्याचप्रमाणे **भारतीय संस्कृतीत श्रेष्ठ ज्ञान उपलब्ध असतानाही भारतवासी त्याचा वापर करीत नाहीत अर्थात त्यानुसार आचरण करीत नाहीत, ही मोठी विडंबना आहे.' याचाच परिणाम असा होतो की कलियुगाच्या शेवटी भारतात धर्माची अतिग्लानी होते.**

## ❒ वर्तमान कलियुगातील दिवाळी आणि भविष्य सत्ययुगातील सदा दिवाळी

खर तर वर्तमान कलियुगातील दिवाळी आणि भविष्य सत्ययुगातील दिवाळी यांच्यात रात्र व दिवस इतके अंतर आहे अर्थात महद् अंतर आहे. कलियुगातील दिवाळी ही केवळ अल्पकाळापुरती आहे. त्यापासून देखील लाखो-करोडो लोक वंचित आहेत कारण कलियुगात मनुष्य रोज नवीन-नवीन समस्यांना तोंड देत आहे. महागाई, बेरोजगारी, वाढती लोकसंख्या, भ्रष्टाचार, पापाचार, हिंसाचार, आतंक-वाद, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक समस्यांची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. **आज मनुष्य केवळ आशेवर जगत आहे. केव्हातरी चांगले दिवस येतील (अच्छे दिन आयेंगे) या आशेवर तो येणाऱ्या प्रत्येक दिवसाकडे पहात आहे. परंतु कलियुगाच्या या अंतिम समयी मनुष्याने कधी कल्पनाही केली नसेल अशी समस्या त्याच्यापुढे अचानक येऊन उभी ठाकते.** नुकताच काश्मीर मधील नद्यांचा महापूर आपण डोळ्यांनी पाहिला. त्यात शेकडो लोक बळी गेले. लाखो लोक बेघर झाले, सुमारे ६ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले. अशाच प्रकारचे महापूराचे तांडव बिहार, उत्तर प्रदेश, हरियाणा, इत्यादी राज्यातून कमी-अधिक प्रमाणात झाले. आता विचार करा की अशा पूरग्रस्त लोकांनी दिवाळी कशी साजरी करावी? लाखो परिवारांना या महापूराची झळ पोचली आहे. त्यांना धड खायला-प्यायलाही मिळत नसेल. त्यांच्यासाठी दिवाळी आपल्याबरोबर काय घेऊन आली तर फक्त दिवाळ!

जागितक स्तरावर विचार केल्यास आज विश्वात पुन्हा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. ईस्लामिक स्टेट इन इराक अँड सीरिया (ISIS) या दहशतवादी संघटनेचे संकट गंभीर झाले आहे. त्यांनी नुकतेच दोन अमेरिकी पत्रकार व एका ब्रिटिश नागरिकाचा शिरच्छेद केला आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेने 'आयएसआयएस' च्या

विरोधात आघाडी उघडली असून विविध देशांना बरोबर घेत ही लढाई लढण्याची तयारी केली आहे. तात्पर्य म्हणजे परिस्थिती दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालली आहे. म्हणूनच या कलियुगाला दु:खधाम, रावणराज्य, मायापुरी वा नर्क असेही म्हटले जाते.

**या नर्कतुल्य सृष्टीचे पुन्हा स्वर्गात परिवर्तन करण्यासाठी, भारतात पुन्हा स्वर्ग स्थापण्यासाठी, नराला श्रीनारायण व नारीला श्रीलक्ष्मी बनविण्यासाठी, स्वर्ग रचयिता निराकार शिव परमात्मा आता सृष्टीवर अवतरित झाले आहेत व साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा यांच्याद्वारे सत्य ज्ञान व सहज राजयोग शिकवित आहेत. याद्वारेच मानव देवता-तुल्य बनतो व ही सृष्टी पुन्हा स्वर्ग बनते.** वर्तमान समय हा परमात्म शक्तीद्वारे महापरिवर्तनाचा समय आहे. आता लवकरच निकट भविष्यात कलियुगी सृष्टीच्या महाभारी विनाशानंतर, भारतात पुन्हा सत्ययुगी दैवी सृष्टीची स्थापना होत आहे. सत्ययुग अर्थात जेथे सत्य आहे, जेथे ज्ञानस्वरूप देवी-देवता निवास करतात तसेच जेथे अमरत्व आहे तेथे श्रीलक्ष्मी व श्री नारायणाचे राज्य असते. (श्रीकृष्ण व श्रीराधा यांचेच नाव स्वयंवरानंतर श्रीनारायण व श्रीलक्ष्मी असे ठेवले जाते). ईश्वरी ज्ञानानुसार त्यांचा राज्याभिषेक जेव्हा होतो तीच खरी दिवाळी होय. याचीच यादगार म्हणून आजही मोठ्या आनंदाने दिवाळी साजरी केली जाते तसेच दिवाळीला श्रीलक्ष्मीचे आवाहन केले जाते.

सत्ययुगात देवी-देवतांची आत्मज्योति प्रज्वलित असते अर्थात त्या आत्मअभिमानी असतात. त्यामुळे घरा-घरात सदा आनंद, सुख, शांती यांचे साम्राज्य असते. तेथे प्रकृतीचे सुख, आत्म्याचे सुख, बुद्धीचे सुख, मनाचे सुख, संबंधांचे सुख, अशी सर्व सुखे प्राप्त असतात. सत्ययुगात अपार संपत्ती प्राप्त असल्याने सोन्याचे महाल, हेलिकॉप्टर, विमान इत्यादी सर्व वैभव प्राप्त असते. मुख्य म्हणजे देवी-देवतांची काया सदा निरोगी असते. तेथे अकाले मृत्यु होत नाही. तेथे प्रकृतीची पाचही तत्वे सेवेला तत्पर असतात. अशाप्रकारे जेथे अपार सुख आहे तेथे सदा आनंदाची दिवाळी आहे. याचेच गायन आजही भक्तिमार्गात पुढील-प्रमाणे केले जाते, 'विठोबाचे राज्य (अर्थात श्रीनारायणाचे राज्य) आम्हा नित्य दिपवाळी।'

### ❒ दीपमाळेचे रहस्य

दिवाळी वा दीपावली या शब्दाचा अर्थ आहे दिव्यांची पंक्ती वा माळ. या सणात घरोघरी पणत्या, आकाशकंदिल तसेच रंगबेरंगी विद्युत दिव्यांच्या माळा लावून रोषणाई केली जाते. उपनिषदातील 'तमसो मा ज्योतिर्गमय।' (अर्थात, हे प्रभू ! आम्हाला अज्ञान अंधःकाराकडून ज्ञान प्रकाशाकडे घेऊन चल). या प्रार्थनेचा संबंध दिवाळीच्या सणाशी आहे.

आज मनुष्याला आत्मस्वरूपाची विस्मृती झाल्याने, तो अज्ञानवश स्वतःला देह समजत आहे. या देहअभिमानातूनच पाच विकारांची उत्पत्ती होते आणि त्याच्या हातून विकर्म घडत जाते. परिणामतः त्याला दु:ख भोगावे लागते. यातून मुक्त होण्यासाठी स्वतःला आत्मा समजण्याची नितांत गरज आहे. अशारीतीने जेव्हा अनेक मनुष्य आत्म्यांची ज्योति जागेल तेव्हाच खरी दीपमाळा तयार होईल. या चैतन्य दीपमाळेत मुख्य तीन विशेषता असतात, १) समीपता, २) संपन्नता व ३) संपूर्णता.

आत्मज्योति जागल्यानंतर सर्वप्रथम आपल्या लक्षात येते की **आपण सर्व आत्मे एक परमात्मा शिव पित्याची मुले असल्याने, आपापसात भाऊ-भाऊ आहोत. या आत्मिक स्नेहातून समीपता निर्माण होते. एक ईश्वर, एक विश्व परिवार (One God, One World Family) ही भावना मनात भरून उरते.** दुसरी गोष्ट म्हणजे ब्राह्मण आत्म्याचे आदि स्वरूप हे सर्वगुण संपन्न आहे. त्यामुळे सत्ययुगात केवळ एक श्रीलक्ष्मी ही धनदेवी बनत नाही तर सर्व देवी-देवता धनाने संपन्न बनतात. तिसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक आत्म्याचे अनादि स्वरूप हे सदा जागती ज्योति, संपूर्ण स्वरूप आहे. याचेच प्रतीक म्हणून स्थूल दीपमालेतील दीपक हे एकमेकांच्या समीप, पूर्णतः प्रज्वलित व एकरस जळणारे असतात. आपले प्रत्येक सेवाकेंद्र हे देखील एक चैतन्य दीपमाळा आहे. तिची सुंदरता ही तेथील चैतन्य दीपकांची (अर्थात आत्म्यांची) समीपता, संपन्नता व संपूर्णता यावर आधारित आहे.

### ❒ दिवाळी कशी साजरी करावी ?

दिवाळीपूर्वी लोक आपल्या घराच्या कानाकोपऱ्याची

सफाई करून ते सुशोभित करतात व दिवाळीच्या दिवशी श्रीलक्ष्मीचे आवाहन करतात. धन व अलंकारांना श्रीलक्ष्मी मानून त्यांची ते पूजा करतात. परंतु अशाप्रकारे श्रीलक्ष्मीचे आगमन होत असते तर आपला भारत देश जेथे एकेकाळी सोन्याच धूर निघत होता, असे ज्याचे वर्णन केले जाते, तो आज आर्थिकदृष्ट्या इतका गरीब राहिला नसता. **खरं तर शिव परमात्मा देत असलेल्या सत्य गीता-ज्ञानाने व शिकवित असलेल्या राजयोगाने अशुद्ध संस्कारांची जळमटे काढून टाकून, आपण आपली मन-मंदिरे साफ केली तर श्रीलक्ष्मी व श्रीनारायणाचे भारतात पुन्हा आगमन होईल व आपला भारत पुन्हा सुख-शांती संपन्न व धन-धान्यांनी समृद्ध होईल. फलस्वरूप तेथे सदा दिवाळी असेल.**

दिवाळीच्या प्रत्येक दिवसामागे देखील आध्यात्मिक रहस्य दडलेले आहे. दिवाळीचा पहिला दिवस आहे, वसुबारस. यादिवशी सवत्स धेनूचे अर्थात पवित्रतेचे पूजन केले जाते. दुसरा दिवस आहे धनत्रयोदशीचा. परमात्मा पित्याकडून आपल्याला संगम-युगात रोज अविनाशी ज्ञान धनाची प्राप्ती होत असते. याचे प्रतीक आहे धनत्रयोदशी. तिसरा दिवस आहे नर्कचतुर्दशी. राजयोगाच्या अभ्यासाने जेव्हा आपली स्थिती शक्तिशाली बनत जाते तेव्हा आपल्या आत्म्यामध्ये असलेल्या पाच विकाररूपी नरकासुराचा नाश होतो. त्यामुळे आपण निर्विकारी बनतो अर्थात खऱ्या अर्थी नर्कचतुर्दशी साजरी करतो. त्यानंतर आपली आत्मज्योति (आत्मिक स्मृती) अखंडपणे तेवत रहाते, याचे प्रतीक आहे दिवाळी. पाचवा दिवस आहे बलिप्रतिपदा. हे आहे सत्ययुगाचे प्रतीक. यावेळी कलियुगातील बळीचे राज्य संपुष्टात येते व भारतभूमीवर पुन्हा नवयुगाचा प्रारंभ होतो. त्यानंतर दिवाळीचा शेवटचा दिवस आहे भाऊबीजेचा. भाऊ बहिणी-तील पवित्र प्रेमाचे प्रतीक असलेला हा मंगल मीलनाचा दिवस! सत्ययुगातील देवी-देवता या आत्मअभिमानी असल्याने, त्यांच्यात सदैव आत्मिक प्रेमाची गंगा वाहत असते. यावरून आपल्या हे लक्षात आले असेल की दिवाळीचे सहा दिवस, संगमयुगाचेच प्रतीक आहे कारण संगमयुग अर्थात कलियुगाचा अंत आणि सत्ययुगाचा आदि यांचा संधीकाळ, ज्यावेळी महापरिवर्तन होते.

तेव्हा यावर्षी दिवाळीच्या शुभमुहुर्तावर आपण हाच दृढ संकल्प करू या की मी ईश्वरी ज्ञान व राजयोगाच्या अभ्यासाने, आत्मज्योति सदैव प्रज्वलित करीन. आसुरी अवगुण आणि कुसंस्कारांचे खाते बंद करून दैवी गुणसंपन्न बनेन तसेच मानवमात्राच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी तन-मन-धन सफल करील.' असे केल्यानेच ही भारतभूमी पुन्हा स्वर्गभूमी बनेल, जेथे सदा दिवाळी असेल. सारांशाने, असे म्हणता येईल,

**लक्ष लक्ष आत्मदीप उजळू या।**
**भारतात या पुन्हा स्वर्ग स्थापू या।**

**❐ दिवाळीचे सहा दिवस नेमका काय संदेश देतात?**

**आपण जर थोडा खोलवर विचार केला तर एक सुंदर नवीन रहस्य आपल्या लक्षात येईल की दिवाळीचे हे सहा दिवस आपल्यातील षड्रिपूंवर (काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार व मत्सर) विजय प्राप्त करण्याचा संदेश देतात.** परंतु भक्तिमार्गात शास्त्रातून रोचक कथांच्या माध्यमातून हा संदेश दिला असल्याने, त्यातील गर्भितार्थ दुर्लक्षित झाला असावा आणि पुढे केवळ एक सण म्हणून दिवाळी साजरी होऊ लागली असेल. कसे ते थोडक्यात पाहू.

दिवाळीचा पहिला दिवस वसुबारस. त्यादिवशी सवत्स धेनूची पूजा केली जाते. याला कारण म्हणजे गाईला पवित्र मानून तिच्या पोटात ३३ कोटी देवता आहेत अशी शास्त्रातून मान्यता आहे. त्यामुळे गाईची पूजा अर्थात पवित्रतेची पूजा. जीवनात पवित्रता धारण केल्यानेच आपण काम विकारावर जीत प्राप्त करतो. त्यानंतर धनत्रयोदशीच्या दिवशी संध्याकाळी धनाची पूजा करतात. तसेच हातात अमृतकुंभ घेऊन उभ्या असलेल्या धन्वंतरीची प्रतिमाही पूजली जाते. वास्तविक आध्यात्मिक ज्ञान हेच खरे धन वा अमृताचा कुंभ आहे. त्याची जीवनात धारणा केल्यानेच आपण क्रोधमुक्त बनू शकतो. नर्कचतुर्दशीला नरकासुराचा वध केल्याची कथा आहे. या कथेतील नरकासुर हे लोभाचे प्रतीक आहे. त्याने त्रैलोक्याचे राज्य प्राप्त करण्यासाठी वीस हजार कुमारिकांचा बळी देणारा 'नारीमेध यज्ञ' करण्याचे ठरवले होते. त्यासाठी त्याने

▶ पान क्र. १० वर

# अतींद्रिय सुख काय आहे आणि ते कसे मिळू शकते?

*ब्र.कु. सरला, कोपरगाव.*

ईश्वरी ज्ञान व योगाद्वारे माणसाला सर्वात मोठी प्राप्ती तर अतींद्रिय सुखाच्या रूपात प्राप्त होते. **मुक्ती व जीवन-मुक्तीची प्राप्ती तर नंतर होते पण योगाभ्यास व ज्ञानाच्या धारणेचे या ब्राह्मण जीवनात जे प्रत्यक्ष फळ मिळते ते तर अतींद्रिय सुखच होय.** ज्याच्या जीवनात जितके अधिक अतींद्रिय सुख आहे, त्यावरून समजावयास हवे की तितका तो मोठा योगी आहे त्याच्यात ज्ञानाची तितकी अधिक धारणा आहे.

### ❒ इंद्रिय सुख आणि अतींद्रिय सुखाची तुलना

आज जेव्हा बऱ्याच लोकांना ईश्वरी ज्ञान आणि सहज राजयोगाचे शिक्षण प्राप्त करण्यासाठी निमंत्रण देण्यात येते तेव्हा ते म्हणतात की, 'आम्हाला तर सर्व प्रकारचे सुख प्राप्त आहे म्हणून ज्ञानाच्या प्राप्तीविषयी आम्हाला काही आवड नाही.' पण त्यांना हे माहित नाही की त्यांना जे सुख प्राप्त आहे, ते तर केवळ इंद्रिय सुख होय, अतींद्रिय सुख तर याहून श्रेष्ठ असते, ज्यासाठी कित्येक राजांनी राज्य वा सिंहासनाचाही त्याग केला होता. आमच्या सांगण्याचा हा अर्थ नव्हे की अतींद्रिय सुखाच्या प्राप्तीसाठी राज्य वा सिंहासन किंवा घरदार सोडण्याची गरज आहे पण आमचे मत हे आहे की अतींद्रिय सुख फार उच्च मानले गेले आहे. गोपींच्या अतींद्रिय सुखाचे गायन भागवतात किती महत्वपूर्ण आहे ! तेव्हा लोकांना सांगावयास हवे की आपणास इंद्रिय सुख तर आहेच आता अतींद्रिय सुख प्राप्त करू या.

**अतींद्रिय सुखाचा अर्थ आहे आत्मिक सुख जे सुख इंद्रियांद्वारे नव्हे तर इंद्रियांहून वेगळे होऊन मिळते. प्रत्येक इंद्रियाचा आपापला विषय आहे जे भोगल्याने माणसाला इंद्रिय सुख मिळते.** डोळ्याचा विषय सुंदर दृश्य होय, कानाचा विषय सुस्वर ध्वनी होय, जीभेचा विषय स्वाद किंवा रस होय, त्वचेचा विषय कोमलता किंवा स्पर्श होय, नाकाचा विषय सुगंध होय. जेव्हा हे विषय माणसाला मिळत नाहीत तेव्हा त्यांच्या अधीन झालेला माणूस दुःख किंवा अशांती अनुभवतो. जेव्हा एखादा माणूस कोण्या एका विषयाला इंद्रियाच्या सामर्थ्याहून अधिक भोगतो तेव्हासुद्धा त्याला दुःख होते. तसेच विषय भोगता-भोगता इंद्रिये शिथिल होतात व तेव्हासुद्धा विषयी माणूस दुःखी होतो. विषयोन्मुख माणूस विषयाला जितका भोगतो तितकीच त्याच्या मनात भोगण्याची अधिक इच्छा होते व तो विषयांचा गुलाम झालेला, सदैव वखवखलेला, अतृप्त आणि अशांत राहतो. विषय सुखात पडलेल्या माणसात आसक्ती असते व कोणत्याही इंद्रियाचा विषय न मिळाल्यास त्याला राग येतो आणि त्याच्या पूर्तीत जो माणूस बाधक बनतो त्यापासून ईर्ष्या, द्वेष उत्पन्न होतो. याप्रकारे इंद्रिय सुखाची कामनाच माणसाला ना केवळ आत्मस्थितीपासून खाली आणून त्याला प्रकृतीवर अवलंबून रहावयास लावते; इतकेच नव्हे तर त्याच्यात काम, क्रोध वगैरे मनोविकारही उत्पन्न करते ज्यापायी त्याच्या जीवनात अशांती वाढते. आज नाही तर उद्या इंद्रियांच्या स्वाधीन झालेल्या माणसाला इंद्रिये शोकसागरात ढकलून देतात.

परंतु अतींद्रिय सुख जितके प्राप्त केले जाईल तितके ते लाभदायक असते आणि त्यापासून माणूस तितकाच निर्विकार बनतो तसेच त्याच्यात इतकी शांती असते की तो दुसऱ्यांनाही शांत करतो. अतींद्रिय सुख प्राप्त केलेला माणूस प्रकृती किंवा एखाद्या सांसारिक विषयाचा गुलाम होत नाही उलट तो आत्मरस चाखत राहतो आणि प्रभूप्रेमास पात्र ठरतो. जो माणूस स्वतःला शरीर किंवा इंद्रियांपासून वेगळा मानून आत्मस्वरूपात स्थित होतो किंवा परमपिता परमात्म्याच्या मधुर स्मृतीचे रसपान करतो तोच अतींद्रिय सुखाच्या हिंदोळ्यात झोके घेत राहतो. या सुखाच्या प्राप्तीसाठी ना एखाद्या स्थूल साधनाची आवश्यकता लागते, ना धनाची.

### ❒ अतींद्रिय सुख किती प्रकारचे असते ?

***स्व-स्थिती :*** जसे सांसारिक सुख कित्येक प्रकारचे असते तसेच ज्यांनी ईश्वरी ज्ञान प्राप्त केले आहे, त्यांना अतींद्रिय सुखही कित्येक प्रकारांनी होते. उदाहरणार्थ, जसे जगात माणसाला स्वास्थ्याचे एक प्रकारचे सुख होते, तसेच ज्ञानवान व्यक्तीलाही स्वास्थ्याचे (स्व-स्थिती) अर्थात आत्मस्थिती (self consciouness) सुख मिळते. स्वतःला 'आत्मा'

निश्चित करणाऱ्या किंवा आत्म्याला निरोगी (काम, क्रोधादी रोग रहित) ठेवणाऱ्या व्यक्तीलाही एक प्रकारची मस्ती चढत असते. ती निजानंदात बुडालेली असते. तिच्यात आत्मिक बल असल्याने सामर्थ्याची खुशी सामावलेली असते. आत्म्याच्या निरोगी किंवा निर्विकारी स्वरूपात स्थित राहिल्याने तिला जीवनात खूप रस अनुभवाला येतो आणि उल्हास तसेच उत्साह वाटतो. म्हणून अतींद्रिय सुखाची कामना करणाऱ्या माणसाने स्व-स्थितीत रहावे.

***ज्ञान धनाद्वारे अतींद्रिय सुख :*** जसे सांसारिक सुखात धनाचे सुखही एक फार मोठे सुख आहे, तसेच ज्ञानसुद्धा एक अविनाशी धन होय. ज्ञानरूपी धनाची जितकी अधिक धारणा असेल, माणसाला तितकीच अधिक तिची एक सूक्ष्म खुशी असते. जसे जगात धनाने माणूस अनेक कामे करू शकतो व धनाचा त्याला एक विशेष नशा असतो, तसेच **ज्याच्या बुद्धीरूपी तिजोरीत ज्ञानधन असेल तोही जीवनाच्या अनेक समस्या सोडवू शकतो, म्हणून त्याला कसली चिंता नसते. उलट ज्ञानवान माणूस बेपरवाह बादशहासारखा वागतो.** तो ईश्वरी ज्ञानाचे मनन-चिंतन करत फारच हर्षमय अवस्थेत राहतो. ज्ञानाच्या एखाद्या रहस्याचे मंथन करत आपोआपच त्याच्या ओठांवर स्मित झळकते. सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे व ८४ जन्मांचे रहस्य जाणल्यानंतर त्याला सदैव आपली चढती कलाच अनुभवास येते. फलस्वरूप तो सदैव आत्मिक किंवा अतींद्रिय सुखात झोके घेतो. तो सांसारिक दृष्टिकोनाने निर्धन असेल, शारीरिकदृष्ट्या रोगी असेल, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या जातीचा असेल पण ईश्वरी ज्ञान आता त्याच्या मागील, वर्तमान तसेच आगामी जीवनावर ज्ञान प्रकाश पाडते व त्याच्या बुद्धीत असे खजीने भरते की ज्यामुळे तो सदैव सुख व शांती अनुभवतो. म्हणून अतींद्रिय सुखाच्या प्राप्तीसाठी माणसाने ईश्वरी ज्ञानाची अधिकाधिक धारणा करावयास हवी, ज्ञानमंथन करावयास हवे व ईश्वरी ज्ञानाची, माणसांद्वारे दिलेल्या मतांशी तुलना करावयास हवी.

***अतीतशी तुलना आणि भविष्य प्राप्तींचा नशा :*** माणूस जेव्हा आपल्या गत जीवनाची वर्तमान जीवनाशी तुलना करून पाहतो की आधी त्याच्यात व्यसने किंवा मनोविकार होते आणि आता त्याच्यात सर्वगुण तसेच शक्तींची धारणा होत आहे. तसेच भविष्यात आपण स्वर्गीय सुख किंवा देवपदाच्या प्राप्तीस योग्य बनू तेव्हा त्याला फारच आत्मिक खुशी होते. जरी या पुरुषार्थाने माणसाला आता त्याच्या हातात सोन्याची नाणी मिळत असल्याचे दिसत नसेल तसेच त्याचे भविष्य या कलियुगी जगात एखादे मोठे पद किंवा पुढारीपण किंवा राज्याच्या रूपात या स्थूल डोळ्यांनी त्याला दिसण्यात नसेल तरी त्याला दिव्य चक्षूंनी हे स्पष्ट दिसते की भविष्यात तो २१ जन्मांसाठी स्वर्गीय देवपद प्राप्त करणारा आहे व वर्तमानकाळीसुद्धा तो मनोविकारांच्या अग्नीत जळण्यापासून तसेच अशांती आणि शोकसागरात बुडण्यापासून वाचला आहे. म्हणून त्याला अमाप आनंद होतो. जेव्हा तो पाहतो की काही काळापूर्वीपर्यंत तो एक अगदी अज्ञानी, मनोविकारी, मूर्ख किंवा घुबडासारखा आंधळा होता परंतु आता परमपिता परमात्म्याने त्याला अपार ज्ञान देऊन त्याचे डोळे उघडले आहेत तसेच त्या त्रिलोकीनाथ प्रभूचा तो मुलगा बनला आहे व ईश्वरी वारसाचा अधिकारी झाला आहे तेव्हा त्याला अतींद्रिय सुखाचा पारावार रहात नाही. तेव्हा माणसाने शिवबाबांचे स्मरण करताना मनातल्या मनात म्हणावयास हवे की, 'बाबा! आपण किती कृपाळू आहात! आपण मला नीचापासून किती उच्च बनविले आहे!' अशीच शिवबाबांची महिमा इतरांनाही ऐकवावी.

***विशिष्ट व्यक्तींशी परिचयाचा नशा :*** जगातही जेव्हा एखाद्या माणसाचा विशिष्ट व्यक्तीशी (V.I.P.) परिचय किंवा संबंध असतो तेव्हा त्याला या गोष्टीचा बराच नशा असतो. पण ज्ञानवान माणसाचा संबंध तर स्वतः परमात्म्याशी असतो जो सर्वाधिक उच्च आहे व ज्ञानाचा सागर, शांतीचा सागर, सर्व शक्तिवान, त्रिलोकीनाथ तसेच सर्वांचा सद्गती-दाता आहे. परमात्म्याहून मोठा तर कोणीही नसतो. म्हणून **ज्ञानवान माणूस जेव्हा ही स्मृती धारण करतो की स्वतः परमात्माच मज आत्म्याचा माता-पिता, परमशिक्षक व परमसद्गुरु आहे, तोच मला ईश्वरी ज्ञान शिकवीत आहे, मला मार्गदर्शन करीत आहे, माझी पालना करीत आहे तेव्हा या अतींद्रिय सुखामुळे त्याचा आनंद गगनात मावत नाही. ज्या प्रभूला शोधण्यासाठी संन्याशी वनात जातात, राज-सिंहासनाचा व राज्याचाही त्याग करतात तसेच भक्त आपले**

**शीरही उतरवून ठेवण्यास तयार होतात, तो परमपिता परमात्मा प्रत्यक्षात मिळाला मग आणखी काय हवे?** जे मिळवायचे होते ते मिळाले तेव्हा काय बाकी राहिले असा अनुभव केल्या कारणाने ज्ञानवान माणूस फारच अतींद्रिय सुखात राहतो. तेव्हा साधकाने सदा स्मृतीत ठेवावयास हवे की मी तर परमपिता परमात्म्याचा सुपुत्र आहे, तोच माझा शिक्षक व सद्‌गुरुही आहे. अहाहा! मी किती सौभाग्यशाली आहे!

***ईश्वरी कुळाची खुशी :*** सांसारिक माणसांना आपल्या उच्च कुळाचाही नशा असतो. राजकुळातला बालक स्वतःला एक सर्वोच्च कुळाचा मानून फार खुशीत राहतो पण **वास्तविक सर्वांत उच्च कुळ तर संगमयुगी ब्राह्मण कुळ होय. ज्याची रचना स्वतः निराकार परमपिता शिव, प्रजापिता ब्रह्माद्वारे करतो. याच कुळाचे गायन सर्व शास्त्रात पांडव, शिव-शक्ती, गोप-गोपी, राम-सेना इत्यादी नावांनी आहे.** याच खऱ्या ब्राह्मण कुळाच्या नावावरच आजचे विकारी ब्राह्मणही मौज मारतात. हेच वास्तविक ब्रह्मचाऱ्यांचे कुळ, राज-ऋषींचे कुळ, परमहंसांचे कुळ, राजयोग्यांचे कुळ किंवा ईश्वरी कुळ होय, ज्याचा कुळपिता स्वतः शिव परमात्मा तथा प्रजापिता ब्रह्मा होय. म्हणून जी ज्ञानवान व्यक्ती आपल्याला या पवित्र कुळाची स्मृती ठेवते तिलाही फारच अतींद्रिय सुख असते कारण हे कुळ आत्मिक कुळ आहे, दैहिक नव्हे. म्हणून साधकाने सदैव स्मृतीत ठेवावयास हवे की आता मी शुद्रापासून ब्राह्मण किंवा श्रेष्ठ कुळाचा झालो आहे. ही माझ्यासाठी परम सौभाग्याची गोष्ट होय.

***सेवेमुळे अतींद्रिय सुख :*** जेव्हा एखादा माणूस दुसऱ्यांची सेवा करतो तेव्हा त्यालाही फार खुशी होते. कोण्या एका भुकेल्याची भूक भागवून, तहानलेल्याला पाणी देऊन, रडत असणाऱ्याला हासवून, निर्धनाला धन देऊन कोणाला आनंद होणार नाही. याचप्रकारे जी ज्ञानवान व्यक्ती योगाचे शिक्षण देऊन एखाद्या रडत असलेल्याला हासविते, दुःखी आत्म्याला सुखी करते, ज्ञान-विहीनाला ज्ञानधन देऊन कायमचा धनवान बनविते आणि त्याची सुख शांतीची भूक भागविते; तिला स्वतःलाही फारच मानसिक खुशी अर्थात अतींद्रिय सुख प्राप्त होते. माणूस दुसऱ्यांना जितके गुणदान देतो, जितके त्यांचे कल्याण करतो, जितक्यांच्या जीवनाला ज्या सीमेपर्यंत पावन बनविण्यास निमित्त बनतो तसेच ईश्वराशी योग जोडण्याची सेवा करतो, तितकाच अधिक त्याच्या खुशीचा पारा वर चढतो.

***अधिकाधिक अतींद्रिय सुख प्राप्त करण्याच्या युक्त्या :*** म्हणून ज्या माणसाच्या जीवनात अतींद्रिय सुखाची उणीव आहे त्याने उपरोक्त प्रकारे आत्मिक सुख प्राप्त करावयास हवे. **सर्वात उत्तम विधी तर ही आहे की त्याने स्वस्थितीत रहावे. आत्माभिमानी (soul conciousness) स्थितीत स्थित होणे तसेच परमपिता परमात्म्याच्या स्मृतीत स्थित होणे हीच आनंद किंवा अतींद्रिय सुखाचा खजिना प्राप्त करण्याची चावी होय.** अहाहा! आनंदाचा सागर, प्रेमाचा सागर, ज्योतीर्बिंदू परमात्म्याच्या प्रेमात मग्न, आनंदाच्या रसात बुडून गेल्यानेच जीवनाची सार्थकता आहे. जो योगी जीवनाच्या, आनंदात रहात नाही तो तर आपल्या संगमयुगी हिरेतुल्य जीवनाला, कवडी बदल्या गमावून बसत आहे!!

***ज्ञानमंथन :*** अतींद्रिय सुखाच्या प्राप्तीचे दुसरे साधन आहे रोज ज्ञानस्नान तसेच ज्ञानमंथन. जो ब्राह्मण मुरली क्लासला रोज जात नाही त्याच्या आत्मिक सुखात उणीव येणे सुरू होते कारण शिव परमात्म्याच्या महावाक्यांची मुरली तसेच त्याद्वारे स्थापित केलेल्या ज्ञान केंद्राचे दिव्य वातावरण, पवित्र भावा-बहिणींचे संघटन तसेच परिवाराप्रमाणे मिलन, या सर्वांपासून तो वंचित राहतो. शिवबाबांची ज्ञानमुरलीच साधकाला श्रेष्ठ मत देणारी, त्याच्या आत्म्याला ताजेतवाने (refresh) करणारी, त्याची आत्मिक बॅटरी चार्ज करून त्याला शक्ती देणारी तसेच त्याच्या समस्यांचे निरसन करणारी आहे. म्हणून मुरली क्लासला कधीही अनुपस्थित राहता कामा नये. नंतर ज्ञानमंथनही करावयास हवे.

***आत्मिक सुखसंवाद (रूहरिहान) :*** अतींद्रिय सुखात हेलकावे अनुभवण्याची एक अनमोल विधी आहे, रोज अमृतवेळेला शिव परमात्म्याशी आत्मिक सुखसंवाद अर्थात स्वतःला आत्मा (रूह) निश्चित करून परमात्म्याशी संभाषण करणे, त्याची महिमा करणे. जी व्यक्ती परमात्म्याची महिमा करते, ती माणसांच्या नामरूपात अडकत नाही तसेच परमात्म्याच्या महिमाच्या आधारे स्वतःही महान बनते.

▶ पान क्र. २३ वर

ब्रह्मावत्सांकरिता...

# ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

(भाग -३)

*ब्र.कु.रमेश शाह, मुंबई (गावदेवी).*

मागील दोन लेखांमधून आपण आदर्श आणि सुव्यवस्थित अशा राज्यव्यवस्थेबाबत विचार करीत आहोत आणि त्याच संदर्भात आता तिसरा लेख लिहित आहे. आदर्श व्यवस्था समजण्यासाठी आपल्याला इतिहास समजून घ्यावा लागेल. त्यासाठी आपल्या यज्ञाद्वारे कल्पवृक्ष व सृष्टिचक्राचे जे चित्र छापलेले आहे त्यांची मदत होऊ शकेल. कारण या चित्रामध्ये पाच हजार वर्षांचा इतिहास संक्षिप्तपणे दाखविला गेला आहे. इतिहासातील काही गोष्टी समजून घेणे यासाठी गरजेचे आहे कारण इतिहास व ड्रामा एकही चूक माफ करीत नाही.

शास्त्रामध्ये कुंभकर्णाबद्दल लिहिले आहे की, त्याने एक चूक केली आणि इंद्रासनाऐवजी निद्रासन मागून घेतले. राजा दशरथाने युद्धाच्या मैदानात राणी कैकयीला दोन वरदान दिले. या दोन चुका झाल्या नसत्या तर रामायण काही वेगळ्या प्रकारे घडले असते. अशाच प्रकारे महाभारतातही, राजा द्रुपदच्या दरबारात जेव्हा द्रौपदी स्वयंवराच्या वेळी धनुर्धर कर्ण मत्स्यभेदन करण्यासाठी उभा राहिला होता तेव्हा जर राजमाता कुंती यांनी कर्ण हा सूतपुत्र नाही परंतु सूर्यपुत्र असून माझा पुत्र आहे, असे म्हटले असते तर किंवा द्रौपदीने हस्तिनापूरच्या महालात दुर्योधनास आंधळ्याचे पुत्र आंधळे असे म्हटले नसते तर महाभारताचे स्वरूप काही वेगळेच घडले असते आणि इतिहासही वेगळा घडला असता.

युरोपच्या इतिहासामध्ये देखील अशाप्रकारचे वर्णन आहे की, नेपोलियनने वाटर्लूच्या युद्धाच्या मैदानात असा समज करून घेतला की ऑस्ट्रियाची सेना अद्याप मैदानात आली नाही आणि त्याने आपली एक तृतीयांश सेना पूर्वेला पाठवून दिली. त्याने ही चूक केली नसती तर वाटर्लूच्या लढाईचे परिणाम काही वेगळे झाले असते. असेच दुसऱ्या महायुद्धामध्ये हिटलरने रशियाशी युद्ध करायची चूक केली नसती तर त्याचा परिणाम काही दुसराच घडला असता.

या सर्व गोष्टींच्या आधारावर सिद्ध होते की, राज्यव्यवस्थेतील एखादी क्षुल्लक चूकही पुढे जाऊन खूप मोठी चूक सिद्ध होते व त्यामुळे राज्यव्यवस्थेच्या कारभारात खूप बदल होतो. **म्हणून शिव बाबा म्हणतात की, सत्ययुगी दैवी राज्यकारभार करण्यासाठी देवता १६ कला संपूर्ण असतील. त्यांच्या राज्यकारभारामध्ये कोणतीही छोटी-मोठी चूक होणार नाही.**

राज्य व्यवस्थेमध्ये शिस्तीबाबत खूपच लक्ष द्यावे लागते. शिस्त पाळण्यात एखादी चूक झाल्यास इतिहास बदलून जातो. उदाहरणार्थ, ब्रिटीश साम्राज्याचा कारभार इतका व्यापक होता की असे म्हटले जाई, ब्रिटीश साम्राज्यात सूर्य कधी अस्त होत नाही कारण बहुतांश देशांवर त्यांनी आपले अधिपत्य स्थापित केले होते आणि राज्य चालविण्यासाठी नीट व्यवस्था केली होती. जसे की इंग्लंडमध्ये दुपारी १२ वाजता पार्लमेंट सुरू होत असे तर भारतात सायंकाळी ५.३० वाजता अर्थमंत्री आपले बजेट सादर करीत असत म्हणजे ब्रिटीश पद्धतीनुसारच त्यांनी सर्व देशांमध्ये आपला राज्यकारभार केला. आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व देशांमधून शासन करण्यासाठी व्हाइसरायची नियुक्ती केली आणि त्यांचा कार्यकाल पाच वर्षांपेक्षा अधिक ठेवला नाही. पूर्वी विमाने नसल्या कारणाने जहाजानेच प्रवास करावा लागत असे. त्यामुळे भारतात पोहचण्यासाठी आफ्रिकेला वळसा घालून समुद्रमार्गे येण्यासाठी खूप वेळ लागत असे. तरीही त्यांनी कुणाला पाच वर्षेपेक्षा अधिक काळ व्हाइसराय म्हणून ठेवले नाही, मग तो देश कॅनडा, ऑस्ट्रेलिया किंवा कोणताही दुसरा देश असो. त्यांना भय असे की एखाद्या व्हाइसरायला अधिक काळ एखाद्या देशात ठेवले तर तो आपले स्थान त्या देशात मजबूत करेल आणि मग तेथील राजा बनून जाईल. परिणामी ब्रिटीश राज्य संपुष्टात येईल. ब्रिटीश राज्यपद्धती शिकण्यासारखी आणि समजण्यासारखी आहे.

भारतामध्ये मराठा साम्राज्याची राजधानी पुणे येथे होती. त्यांनी बडोद्यात गायकवाड, इंदूर येथे होळकर तर ग्वाल्हेर येथे शिंदे (सिंधिया) यांची सुभेदाराच्या स्वरूपात नियुक्ती केली. नंतर त्यांचे तेथे स्थान बळकट झाले आणि मग ते तेथील राजे झाले. त्याचबरोबर तेथे त्यांची वंशपरंपरा सुरू झाल्यामुळे मराठा साम्राज्याचा ऱ्हास होत गेला. तसेच मराठा साम्राज्य विखुरले गेले. पुण्याच्या पेशव्यांनी विचार-पूर्वक सुभेदार नेमून आपल्या हातात सत्ता ठेवली असती तर कारभार सुरळीत राहिला असता व मराठा साम्राज्याचा इतिहास काही वेगळा घडला असता. इंग्रजांनी विविध देशात राज्यकारभार केला पण इंग्लंडमधील सत्ता मात्र मजबूत होती. निवडणूका होत राहिल्या, पार्ट्याही बदलत राहिल्या परंतु तरीसुद्धा त्यांनी राज्याची कमान इमानेइतबारे सांभाळली. स्वातंत्र्यासाठी अनेक देशातून उठाव झाले, जसे १८५७ मध्ये भारतात स्वातंत्र्य संग्राम झाला परंतु या सर्व गोष्टींचा त्यांनी सामना केला आणि फलस्वरूप त्यांची सत्ता कायम मजबूत राहिली.

उपरोक्त गोष्टींमधून प्रामुख्याने एक गोष्ट नक्कीच सिद्ध होते की **जे कुणी राज्यव्यवस्थेसाठी निमित्त बनतात त्यांना आपले साथी आणि साधन-संपत्ती यांचा मेळ घालून कुशल व्यवस्था केली पाहिजे आणि याच व्यवस्थेला पुस्तकां-मधून रिसोर्स मॅनेजमेंट (Resource Management) असे म्हटले जाते** अर्थात आपले साथी आणि साधनांचा १००% परिपूर्ण रूपात प्रबंध करणे. साधनांचा उपयोग करण्यात किंवा त्या व्यवस्थेमध्ये जरा देखील चूक झाली तर त्या आधारावर राज्यव्यवस्था करणाऱ्यावर बदनामीचा डाग लागतो. जसे आपण भारतातील वर्तमान राज्यव्यवस्थे-मध्ये पाहतो की राज्यकारभारातील साधनांचा सुव्यवस्थित उपयोग केला जात नाही व योग्य कार्यासाठी योग्य व्यक्तीची नियुक्ती होत नाही त्यामुळे साधनांच्या वितरणामध्ये फरक पडतो. भ्रष्टाचार इत्यादी कारणांनी राज्यकारभार चांगला होत नाही.

लोकशाहीबाबत ज्या मोठ्या लोकांनी आपले विचार व्यक्त केले त्यातील एक आहे प्रोफेसर डायसी. यांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे की Democracy rarely permit a country to be governed by its ablest man म्हणजे लोकशाहीमधील राज्य व्यवस्थेमध्ये चांगल्या व श्रेष्ठ व्यक्तींना कार्यव्यवहारामध्ये अग्रीम स्थान मिळत नाही. त्यांनी असेही लिहिले आहे की लोकतंत्रामध्ये बाहुबल आणि धनबळाचा कारभार होतो. जी श्रेष्ठ माणसं असतात ती बाहुबल आणि धनबळाच्या लाभामध्ये अडकत नाहीत म्हणून गुंडगिरी आणि हिंसक व्यवहार करणारे राज्य व्यवस्थेच्या कारभारात उतरू लागतात. परिणामी राज्य-व्यवस्था दुषित होत जाते आणि कधी-कधी लोकशाहीच्या बदली वोटशाही (vote power) तेथे जागा घेते व यासाठी असे म्हटले जाते की ज्याच्या हाती ससा, तो पारधी! याप्रकारे योग्य व्यक्ती पुढे येत नाही आणि या कारणाने राज्यव्यवस्था पण योग्यरितीने चालत नाही.

दुसरी गोष्ट अशी आहे की वंश परंपरेच्या आधारावर जेव्हा हा कारभार होतो तेव्हा कधी-कधी योग्य व्यक्ती पुढे येऊ शकत नाही. या सर्व गोष्टींना अनुलक्षून जर आपण **बापदादांच्या यज्ञाचा कारभार पाहिला तर लक्षात येईल की बापदादांनी प्रथम आपल्या साथींना योग्य बनविले आणि म्हणून १९३७ ते १९५० पर्यंत अर्थात भारतात येईपर्यंत सर्वांना ज्ञान, योग आणि धारणा याबाबत संपूर्ण शिक्षण दिले आणि जेव्हा सर्वजण परीक्षेत उत्तीर्ण झाले तेव्हाच त्यांना सेवेसाठी पाठविले.**

बाबांसमोरही वंशपरंपरेचा प्रश्न होऊ शकला असता जसे ब्रह्माबाबांची लौकिक कन्या दादी निर्मलशांताजी वा पुत्रवधू दादी बृजइन्द्राजी या खूप हुशार आणि व्यवस्थापन कार्यात निपुण होत्या. परंतु १९६५ मध्ये जेव्हा मातेश्वरी अव्यक्त झाल्या तेव्हा बाबांनी १ एप्रिल १९६६ च्या साकार मुरलीमध्ये स्वतःच्या हातांनी लिहिले की दादी प्रकाशमणीजी एवं दीदी मनमोहिनीजी यांची मुख्य संचालिका तथा सह-मुख्यसंचालिकेच्या रूपात नियुक्ती केली गेली आहे. म्हणजेच सर्वश्रेष्ठ व्यक्तीद्वारेच सर्वश्रेष्ठ कार्य होऊ शकते ही गोष्ट सिद्ध करून दाखविली. दोन्ही दीदी व दादी यांना ब्रह्माबाबांनी वेळोवेळी यज्ञाचे संचालनाच्या गोष्टींशी परिचित करून त्यांना १००% संचालन करण्यासाठी संपन्न बनविले. त्यांच्या प्रशासनाचा परिणामही आम्ही सर्वांनी

पाहिला की दीदी मनमोहिनी आणि दादी प्रकाशमणी यांच्या काळात यज्ञाचा विकास व विस्तार शीघ्र गतीने झाला.

ज्यावेळेस ज्ञानसरोवर आणि शांतीवनची स्थापना होत होती तेव्हा दादी प्रकाशमणीजी स्वतः जाऊन तेथे उभे राहत आणि कुशल व्यवस्थापनासाठी पूर्ण मार्गदर्शन देत असत. जसे कोणकोणते विभाग बनवावे, कोणी कुठे बसावे, कारभार कसा व्हावा आणि नंतर पुढे सर्व गोष्टींचा विचार करून योग्य व्यक्तींच्या हातात कारभार सोपविला. त्याचबरोबर वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन दिले, त्यांच्याशी देवाण-घेवाण केली, **अशाप्रकारे दादीजींनी यज्ञाचे संचालन अगदी सुव्यवस्थित आणि श्रेष्ठरीतीने केले. त्यांच्या कुशल व्यवस्थापनाची प्रशंसा स्वतः बापदादांनी केली आहे.**

सुरळीत व्यवस्थेसाठी साधनांच्या वापराच्या बाबतीत जर लक्ष दिले नाही तर खूप नुकसान होऊ शकते. उदाहरणार्थ एकदा ब्रह्माबाबा मुंबईत होते तेव्हा त्यांना मधुबनहून पत्र आले होते. त्यात नमूद होते की बाबा, आता पावसाचा मौसम सुरू होईल आणि मजदूरांना छत्र्यांची आवश्यकता राहिल. तेव्हा बाबांनी मला सांगितले की उद्या सकाळच्या क्लासमध्ये मी मुलांची परीक्षा घेईन आणि पाहिन की छत्र्या खरेदी करण्याची समज कोणत्या मुलामध्ये आहे. दुसऱ्या दिवशी बाबांनी क्लासमध्ये सर्वांना म्हटले की मुलांनो मधुबनमध्ये कामगारांसाठी छत्र्यांची गरज आहे म्हणून आपण सर्वांनी एकेक छत्री सॅंपलच्या रूपात घेऊन यावे. मुरलीनंतर मी बाबांना म्हटले की बाबा उद्या मग १२५-१५० छत्र्या येतील. त्यावर बाबा म्हणाले की तू माझ्या मुलांना नाही ओळखत, मीच त्यांना जाणतो. दुसऱ्या दिवशी मी क्लासमध्ये पाहिले की क्लासमधील आठ भाऊ-बहिणींनीच छत्र्या आणल्या होत्या. बाबांनी पाहिले की एका भाऊने १२५ रुपये किंमतीची फॅन्सी सुंदर छत्री आणली होती. बाबांनी त्याला म्हटले की, मुला, एवढी महाग छत्री तू कां आणली? तर त्यावर तो भाऊ उत्तरला की, तुम्ही सांगितले म्हणून आणली. इतरांनी देखील फॅन्सी छत्र्या आणल्या होत्या. फक्त एका भाऊने ८ रुपये किंमतीची, लाकडी हॅंडल असलेली मजबूत छत्री आणली होती. त्याला बाबांनी विचारले की तू एवढी स्वस्त छत्री का आणली? तेव्हा त्याने उत्तर दिले की, ही छत्री तुमच्यासाठी नाही तर मजुरांसाठी आणली आहे. मजुरांचे काम फार अंगमेहनतीचे असते आणि त्यांना अशाप्रकारची मजबूत आणि मोठी छत्री उपयुक्त आहे. त्याचबरोबर लाकडी हॅंडल लगेच तुटणार नाही आणि प्लॅस्टिकचे असल्यास लवकर तुटू शकेल. **तेव्हा बाबा म्हणाले, 'या मुलामध्ये समज आहे कुणासाठी व कशाप्रकारची वस्तू खरेदी केली पाहिजे याची.' अशाप्रकारे बाबा, योग्य व्यक्तीची पारख करून मगच त्या व्यक्तीच्या हाती कारभार देत असत.**

आपल्या सर्व ब्रह्मावत्सांना सुद्धा योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याची आणि साधनांवर व्यर्थ खर्च करू नये यावर खूप लक्ष ठेवले पाहिजे. या गोष्टी आपण जर आताच शिकलो तरच ईश्वरीय कार्यव्यवहारामध्ये आदर्श व्यवस्था संपन्न करून सुरळीतपणे कार्य करू शकू.

***(भावानुवाद - ब्र.कु. जयश्री, मुंबई-विक्रोळी)***

---

▶ पान क्र. ४ वरून

१६ हजार कुमारिकांना पळवून कैदेत ठेवले होते. त्यांना मुक्त करण्यासाठी भगवंताने नरकासुराचा वध केला. त्यामुळे नर्कचतुर्दशी लोभावर विजय मिळविण्याची प्रेरणा देते. नंतरचा दिवस आहे श्रीलक्ष्मीपूजनाचा अर्थात आत्म्याच्या संपूर्ण स्वरूप प्राप्तीचा. असे संपूर्ण स्वरूप तेव्हाच प्राप्त होते जेव्हा आपण नष्टोमोहा स्मृतिस्वरूप बनतो. त्यामुळे मोहाला जिंकण्याची प्रेरणा या दिवसापासून मिळते. त्यानंतर बलिप्रतिपदा हा दिवस अहंकाराला जिंकण्याची प्रेरणा देतो कारण बळी राजा हा दुष्ट व स्वार्थी असुरांचा राजा होता. दिवाळीचा शेवटचा दिवस आहे भाऊबीजेचा. हा दिवस मत्सर या विकारापासून मुक्त बनण्याची प्रेरणा देतो कारण या मनुष्य सृष्टीरूपी कल्पवृक्षाचा बीजरूप एक परमात्मा आहे. आपण सर्व आत्मे, त्याची मुले असल्याने आपापसात भाऊ-भाऊ आहोत मग मत्सर तो कोणाचा आणि कशासाठी करायचा?

**तात्पर्य म्हणजे दिवाळीचे सहा दिवस षड्रिपूंवर विजय प्राप्त करण्याची प्रेरणा देतात. हे लक्षात घेऊन आजवर आपल्यात जे अज्ञान होते, ते दूर करूया व आत्मदीप उजळून, खरी दिवाळी साजरी करूया.** ★ ★ ★

# वर्तमानसमयी नैतिक मूल्यांची आवश्यकता

***ब्र.कु. भगवानभाई, शांतिवन-आबू रोड.***

ज्याप्रमाणे एखादी भिंत बांधताना दोन वीटांमध्ये सिमेंटचा वापर केला जातो, लाकडाला प्लायवुड जोडण्यासाठी फेविकॉलचा वापर केला जातो, लोखंडाला लोखंड जोडण्यासाठी धातूचा वापर केला जातो; त्याचप्रमाणे मनुष्याला मनुष्य जोडला जावा यासाठी दया, क्षमा, शांती, सहयोग, सन्मान, सहनशीलता, संतोष, सरलता, साधेपणा, सत्यता, सेवाभाव इत्यादी नैतिक मूल्यांची आवश्यकता आहे. वर्तमान समयी मनुष्यांमध्ये सद्गुणांचा अभाव झाल्यामुळे शारीरिक, मानसिक, पारिवारिक, सामाजिक अशा अनेक समस्या उत्पन्न झाल्याचे दिसून येत आहे. सद्गुणांची जागा दुर्गुणांनी घेतली आहे. वर्तमान समयी पुस्तकी शिक्षण घेऊन कोणी विद्वान बनला असला तरी नैतिक मूल्यांच्या अभावी तो दुःखी, अशांत आणि तणावग्रस्त जीवन जगत आहे; त्यामुळे नैतिक मूल्यांची जोपासना करणे हीच काळाची खरी गरज आहे.

शाळा-कॉलेजातून विद्यार्थ्यांना फक्त बौद्धिक ज्ञान दिले जाते. त्यांची बौद्धिक क्षमता वाढविण्याकडे लक्ष दिले जाते. त्यांची बौद्धिक क्षमता वाढल्याने, ते शालेय परीक्षांमध्ये चांगल्या मार्कांनी देखील पास होतात परंतु नैतिक आणि आध्यात्मिक शिक्षणाला अभ्यासक्रमात योग्य ते स्थान न दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये बेशिस्त वाढत चालली आहे. निदर्शने, हरताळ, मोडतोड, आगी लावणे आणि हिंसाचार हे प्रकार वाढीस लागले आहेत. मानसिक ताण वाढल्यामुळे तरुण वर्ग मादक पदार्थांच्या व इतर व्यसनांच्या आहारी गेला आहे. त्यामुळे पुढे शिक्षण संपल्यावर जेव्हा ते समाजात वावरू लागतात तेव्हा त्यांच्यापुढे ज्या परीक्षा येतात त्यात बऱ्याच वेळा ते नापास होतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेबरोबरच त्यांची भावनात्मक क्षमता, नैतिक क्षमता व आध्यात्मिक क्षमता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. मानवी जीवनात दिव्यता व पूर्णता आणणे हा शिक्षणाचा खरा उद्देश असला पाहिजे.

मी भारतातील विभिन्न राज्यातील अनेक शाळा-कॉलेजातून तसेच जेलमध्ये सेवेसाठी जात असतो. जेलमध्ये मला तरुण मंडळी मोठ्या प्रमाणावर दिसून येतात कारण या तरुण मंडळींनी पुस्तकी शिक्षणाचे धडे घेतलेले असतात परंतु नैतिक शिक्षणाचे धडे मात्र घेतलेले नसतात. म्हणूनच त्यांच्या हातून अपराध घडतात व ते जीवनाच्या परीक्षेत नापास होतात. तात्पर्य म्हणजे नैतिक मूल्यांचे जीवनात फार महत्व आहे. नैतिक मूल्यांच्या शिक्षणामुळेच आपला जीवनरूपी वृक्ष परोपकार, सेवा, धैर्य, त्याग, औदार्य, पवित्रता यासारख्या अनेक दिव्य गुणरूपी फळांनी बहरून येतो तेव्हाच आपल्या जीवनाचे साफल्य सिद्ध होते.

शिक्षणामुळे माणसाला पैसा कमाविण्याची योग्यता प्राप्त होते. याद्वारे तो अन्न, वस्त्र, निवाऱ्याची गरज पूर्ण करतो. नंतर हळूहळू तो मोटार, बंगला इत्यादी सुखसोयींची साधने जमा करतो. जीवनात याचेही आपले असे महत्व आहे. **पण जीवनात ही स्थूल सुख साधने व पैसा असूनही जर शांती व आनंदाचे धन नसेल तर साऱ्या बाह्य प्रगतीचा काय उपयोग? लोभी माणूस कधीही तृप्त होत नाही आणि त्याच्या कामना कधी पूर्ण होत नाहीत म्हणून आनंदरूपी धनाशिवाय इतर स्थूल धन असूनही जीवनात आनंद येत नाही. हा आनंद नैतिक व आध्यात्मिक शिक्षणामुळेच प्राप्त होतो**, यालाच खरे ज्ञानधन म्हणतात. ते एक जन्मापुरतेच नव्हे तर अनेक जन्म साथ देते म्हणूनच नैतिक मूल्यांना प्रत्येक धर्मात विशेष महत्व दिले आहे.

आजचा मानव हा स्वयंकेंद्रित झाला आहे. तो केवळ स्वतःचा व आपल्या परिवाराचाच विचार करतो. परंतु हा समाज, हे अवघे विश्व हा एक प्रभू परिवार आहे, याचे त्याला विस्मरण झाले आहे. आपण सर्वजण एक परमात्मा शिवपित्याची मुले आपापसात भाऊ-भाऊ आहोत, याची विस्मृती झाल्याने आपसातील स्नेह, सद्भावना, बंधुभाव ममभाव संपुष्टात आला आहे. ज्याप्रमाणे एखाद्या माळेचा धागा तुटल्याने सर्व मणी विखुरले जातात तसे काहीसे आज झाले आहे. पारस्पारिक स्नेहरूपी धागा तुटल्याने समाजात

समरसता अनुभवाला येत नाही. त्यामुळे आपल्या संबंध-संपर्कातील सर्वांना स्नेहाच्या धाग्याने जोडण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येकातील सद्‌गुण पाहा. दुसऱ्यातील दुर्गुण पाहिल्यामुळेच आपसात दुरावा निर्माण होतो, स्नेहभाव कमी होतो, त्यामुळे दुसऱ्यांना दोष देण्या-ऐवजी स्वतःचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे.

ज्याप्रमाणे खळखळ वाहणारी नदी, दगडाची शीला तिच्या मार्गात आली म्हणून त्याला दोष देत बसत नाही. याउलट त्या शीलेचे पाय धुऊन अर्थात तिला स्पर्श करून आपली स्वतःचीच दिशा बदलून आपल्या ठिकाणापर्यंत निघून जाते. त्याचप्रमाणे आपल्या जीवनात अडथळे वा समस्या निर्माण करणाऱ्याला स्वतःच वाकून नमस्कार करून आपल्याला संपूर्णतेच्या ठिकाणापर्यंत पोहोचायचे आहे. त्यामुळे एखादी व्यक्ती माझ्याशी अशी का वागली, मला असं का म्हणाली, तीचे हे वागणे चुकीचे आहे, इत्यादी प्रश्न मनात निर्माण करून आपला वेळ वाया घालवू नका तसेच त्या व्यक्तीशी किनारा करू नका. **सदैव लक्षात ठेवा की आपले संपूर्णतेचे ध्येय गाठण्यासाठी वेळ अतिशय थोडा आहे त्यामुळे आपल्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांना उडती कलाच्या आधारे पार करा. म्हणून एक संतवचन आहे, 'कोणी निंदा अथवा वंदा, आम्हा स्वहिताचा धंदा!'** जशी नदी ही अविरत पुढे जात असते तशी सदैव आपली आत्मोन्नती होत गेली पाहिजे तरच आपण आपले संपूर्णतेचे लक्ष्य गाठू शकू.

नैतिक मूल्यांच्या कमतरतेमुळेच पारिवारिक, सामाजिक, राजनैतिक व धार्मिक संघटना विखुरल्या जातात. म्हणूनच गुणवान बनणे ही काळाची गरज आहे. गुणवान व्यक्तीची युगयुगांतर पूजा होते. 'मरावे परी किर्तीरूपे उरावे' ही म्हण सार्थ करण्यासाठी सद्‌गुणी बनणे आवश्यक आहे. सद्‌गुणांचा संग्रह करणारी व्यक्ती एखाद्या गुलाबाच्या फुला-प्रमाणे इतरांनाही सुगंध देत असते. **वर्तमानसमयी स्वयं परमपिता शिव परमात्मा, या सृष्टीवर अवतरित होऊन मनुष्य आत्म्यांना दैवी गुणांनी संपन्न बनविण्याचे महान कार्य, मागील ७८ वर्षापासून करीत आहेत. जर तुम्हाला आपल्यातील दुर्गुण दूर करून, गुणवान बनायचे असेल तर प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाशी अवश्य संपर्क करा** कारण जोपर्यंत आपल्या जीवनात आध्यात्मिक व नैतिक शिक्षण प्राप्त होत नाही तोपर्यंत सद्‌गुण येणार नाहीत. सर्वगुण संपन्न बनणे हेच शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे. ज्यात दिव्यगुणांचा सुगंध आहे तोच खऱ्या अर्थी सुशिक्षित आहे. त्यामुळे खरे शिक्षण तेच होय जे स्त्री-पुरूषांना देवी-देवतातुल्य बनविते अर्थात माणसात दडलेली दिव्यता प्रकट करते. **अशाप्रकारे पुस्तकी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना नैतिक व आध्यात्मिक ज्ञान दिल्याने मानवी जीवनाला नवी दिशा प्राप्त होईल जी मानवतेला पूर्णत्वाकडे आणि संपन्नतेकडे घेऊन जाईल. वर्तमानसमय हा युग परिवर्तनाचा समय आहे. आता जे आत्मे सद्‌गुणांचा शृंगार करतील तेच सत्ययुग व त्रेतायुगात सद्‌भाग्याचे अधिकारी बनतील.** सारांशाने असे म्हणता येईल -

**आता सत्वर सद्‌गुणांनी संपन्न बनू या सारे।**
**हीच शिवबाबांची शुभकामना पूर्ण करूया रे।।**

## खरी विजयादशमी (दसरा)

भारतवासी दरवर्षी विजयादशमीला रावणाची प्रतिमा करून जाळतात. खर तर कुठल्याही दुःख देणाऱ्या जिवंत माणसाची प्रतिमा करून ती जाळण्याची प्रथा आहे. आपण रावणाची प्रतिमा करून जाळतो, याचा अर्थ तो जिवंत आहे असा होतो. रावण या शब्दाचा अर्थ आहे रडविणारा. रावणाला दहा तोंडे दाखवितात. पाच विकार पुरुषाचे व पाच विकार स्त्रियांचे, याचे प्रतीक म्हणून रावणाला दहा तोंडे दाखवितात. अशा या रावणाचे अर्थात मनोविकारांचे राज्य आज साऱ्या सृष्टीवर आहे. त्यामुळेच ही सृष्टी दुःखधाम बनली आहे. **अशा या मनोविकाररूपी रावणाचा समूळ नाश करण्यासाठी सर्वशक्तिवान शिव परमात्म्याच्या शिवशक्ती-पांडव सेनेत दाखल व्हा आणि खरी विजयादशमी साजरी करा.**



# आपल्या आंतर्आत्म्यातच न्यायमंदिराची स्थापना करा

*ब्र.कु.जगदीश दीक्षित, पुणे.*

सत्य कोणते व असत्य कोणते, पापकर्म कोणते व पुण्यकर्म कोणते, न्यायाची बाजू कोणती व अन्यायाची बाजू कोणती ? याचा यथायोग्य विचार करणारी व त्याप्रमाणे आपले आचरण करणारी माणसे या अधर्माच्या युगात म्हणजे कलियुगात अत्यल्प आहेत. या उलट यथायोग्य व न्याय विचार न करता दुसऱ्यावर अन्याय करण्याची वृत्ती बहुसंख्य लोकांची वाढत चालली आहे. अन्याय करणाऱ्या व्यक्तीला याची पूर्णतः जाणीव असते की मी अमुक एका व्यक्तीवर अन्याय करीत आहे. परंतु त्याच्या मनात लोभाचे प्राबल्य आणि प्रभाव इतका असतो की तो प्रभाव त्याच्या न्यायबुद्धीचे व विवेक शक्तीचे पूर्णतः दमन करतो. आज केवळ याच कारणामुळे देशातील अनेक न्यायालयातील खटले वर्षानुवर्षे चालले आहेत. **प्रदीर्घ काळ चाललेल्या या खटल्यांमध्ये वादी व प्रतिवादींचे आर्थिक नुकसान तर होतेच त्याशिवाय मानसिक ताणही वाढत जातो. हे सर्व टाळावयाचे असेल तर यावर सामोपचार हाच उपाय आहे. त्यासाठी आपसात सुसंवाद साधून आपल्या समस्या आपणच सोडवाव्यात.** परंतु जोपर्यंत अन्याय करण्याच्या वृत्तीचा नाश होत नाही तोपर्यंत या समस्या सुटणे कठीण आहे. समाजात अन्याय करण्याची वृत्ती व लोभाचे प्राबल्य इतके वाढले आहे की कित्येक व्यक्ती आपल्या लोभापोटी न्यायालयात भगवद्‌गीतेवर हात ठेवूनही धादांत खोटे बोलणे, खोटे पुरावे, खोटे साक्षीदार याचा सर्रास वापर करीत आहेत. बंधूंनो, या भारतात असा एक काळ होता की ज्या काळात समाजातील सर्व व्यक्ती सात्विक वृत्तीच्या होत्या. त्या सत्यवादी विश्वात न्यायालयाची आवश्यकताच नव्हती. खरे तर देशात न्यायालय असणे हे देशाचे व देशातील नागरिकांचे वैगुण्य आहे. विचार करा ज्याअर्थी न्यायालये आहेत त्याअर्थी देशात कुणावर तरी अन्याय होत आहे, अनेक गुन्हे घडत आहेत, ठिकठिकाणी चोऱ्यामाऱ्या होऊन दरोडेही पडत आहेत. आज जगात असा एकही देश नाही की जेथे न्यायालय नाही. यावरून हे जगत् अपराधमुक्त नाही असेच म्हणावे लागेल !

**आजचे भारतातील सरकार दावा करीत आहे की 'अच्छे दिन आनेवाले है।' परंतु मानवी सृष्टीचा हा नियम त्यांना ज्ञात नाही की कलियुगाच्या अंताला दुःखाची परिसीमा झालेली असते (अर्थात कलियुगाचा कालावधी फारच थोडा राहिलेला आहे). या दुःखाच्या मुळाशी आहेत मानवाची पापकर्मे.** भगवद्‌गीतेचा सिद्धांत आहे की काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार व मत्सर या षड्‌रिपूंच्या (मानव मात्राचे गुप्त असलेले सहा शत्रू) अधीन होऊन केलेली कर्मे पापकर्मेच आहेत. या पापकर्मामुळेच कलियुगात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा विचार कोणी विरळाच करतो. ज्यावेळी एखादी दुराचारी व्यक्ती कामवश होते त्यावेळी ती व्यक्ती कुणा अबलेवर अत्याचार करते. क्रोधामुळे तर आतापर्यंत अनेक हत्या झालेल्या आहेत. जी इस्टेट आपली नाही त्याविषयी उत्पन्न झालेल्या लोभामुळे न्यायालयात अनेक खटले चालू आहेत. आपल्या प्रिय व्यक्तीचा मृत्यु झाल्यामुळे अनेकांना मोहवश दुःख होत आहे. कधी-कधी हे दुःख इतके पराकोटीचे असते की हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्या व्यक्तीचाही दुःखद मृत्यु होतो. अहंकार दुखविला गेल्याने अब्रू नुकसानीचे अनेक दावे दाखल केले जात आहेत. नात्यातील एखाद्या व्यक्तीची भरभराट पाहून कुणाच्या तरी मनात मत्सर निर्माण होतो. या मत्सरातूनच कुटील कारस्थाने केली जातात. अशाप्रकारे कलियुगात घोर पापकर्मे मानवाकडून होत असल्याने हे युग पूर्णतः असत्याचे युग झाले आहे. असत्याची साथ देऊन वकिली करणारे वकिलही धादांत खोटे बोलून आपला युक्तिवाद न्यायाधीशांसमोर करीत असतात. त्यांची सगळी बुद्धीमत्ता असत्याला सत्य ठरविण्यासाठी खर्च होत असते. त्यांचा आंतर्आत्मा त्यांना सांगत असतो की, हे गृहस्था, तू हे कर्म ठीक केलेले नाहीस. परंतु अशीलाकडून मिळणाऱ्या धनाचा लोभ त्याला त्या कर्माकडे कानाडोळा करण्यास विवश करीत असतो. बंधूंनो, धन

माया नाही परंतु त्याचा लोभ असणे माया आहे. तद्वतच धन वाईट मार्गाने कमविणे व वाईट मार्गाला घालविणे ही माया आहे. या देशात आजही काही वकिल असे आहेत की जे केवळ अन्याय झालेल्या व्यक्तींचेच वकिलपत्र स्विकारतात व त्यांना योग्य तो न्याय मिळवून देतात. अशा वकिलांविषयी निश्चितपणे आदरच निर्माण होतो. हा लेख वाचल्यानंतर काही बुद्धिमान वकिल असेही विचारतील की तुमच्या या तत्वज्ञानाने आमचा उदरनिर्वाह होणार आहे का? त्यासाठी आम्हाला असत्य हे बोलावेच लागते. परंतु त्यांना मानवी सृष्टीचा हा नियम माहित नाही की, हे असत्यच असत्याच्या जगाचा विनाश होण्यासाठी कारणीभूत होत असते.

ज्यावेळी न्यायालयात खटला चालू असतो त्यावेळी वादी व प्रतिवादी तसेच त्या दोघांचेही वकिल आपापल्या घरी केवळ त्या खटल्याचाच विचार करीत असतात. अगदी जेवतानादेखील त्यांचे हे विचारचक्र चालू असते. त्या विचारात ते इतके गर्क झालेले असतात की आपण काय खात आहोत याचेही भान त्यांना रहात नाही. खटल्यातील हारजीतच्या काळजीने कित्येकांची झोप उडालेली असते. एका बाजूला एक व्यक्ती अन्यायाच्या अग्नीत होरपळून निघत असते तर दुसऱ्या बाजूला अन्याय करणारी व्यक्ती कुटील कारस्थानांच्या प्रक्षोभक अग्नीत स्वतःला झोकून देत असते. अशाप्रकारे दोन्ही बाजूंच्या व्यक्ती आपल्या सुखद, सरळ व साध्या आनंदी जीवनाला पारखे होत असतात. त्यांच्याबरोबर त्यांचा परिवारही अशांत झालेला असतो.

आज या भारतात लाखो खटले चालू आहेत. त्या खटल्यांचा निकाल ऐकण्यासाठी वर्षानुवर्षे वाट पहावी लागते. असेही काही उदाहरणे आहेत की वडिलांनी दाखल केलेला दावा मुलाकडे येतो व कधी-कधी वडिलांच्या मृत्युनंतर मुलाला त्याचा न्याय मिळतो. दिल्लीत एका महिलेवर झालेला अमानुष अत्याचार तर सर्वांनाच ज्ञात आहे. त्या घटनेला वर्षापेक्षाही अधिक काळ लोटला असून अद्याप न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेची अंमलबजावणी झालेली नाही. न्यायदानात व शिक्षेच्या अंमलबजावणीत प्रमाणापेक्षा अधिक उशीर होणे हा देखील एक प्रकारचा अन्यायच आहे. ज्यावेळी एखाद्या व्यक्तिची बाजू न्याय असतानाही त्याला न्याय मिळाला नाही तर त्या न्यायालयाला अन्यायालय म्हणावे लागेल. **न्यायव्यवस्थेची ही अवस्था पाहिली की सर्वसामान्य माणसांना असे वाटते की शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये. वर्तमानयुगात त्याच माणसाला सुखी मानले जाते जो कधीही पोलिस चौकी, न्यायालय व हॉस्पिटलची पायरी चढत नाही. अशा पायऱ्या चढण्याची वेळ कुणावरही येऊ नये असे वाटत असेल तर प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या आंतर्आत्म्यातच न्यायमंदिराची स्थापना करून स्वतःच न्यायाधीश व्हावे व न्याय बाजूने निकाल द्यावा.** असा आपापसात न्यायनिवाडा सर्वांनीच केला तर सर्वसामान्य नागरिकांना न्यायालयात जाण्याची आवश्यकताच वाटणार नाही. अशाप्रकारे सर्वात महत्वाचे आहे आपसातील सामंजस्य. हे सामंजस्य सत्ययुगी समाजात होते. फलस्वरूप तेथे ना अन्यायाचे, ना न्यायालयाचे अस्तित्व होते म्हणून समस्त भारतीयांना संदेश आहे की बंधूंनो, सर्वांचे हित साधावयाचे असेल तर आपल्या अंतःकरणातील अन्यायाचा, लोभाचा व असत्याचा असुर नष्ट करा. स्वतःवर अन्याय होऊ देऊ नका व दुसऱ्यावरही अन्याय करू नका.

कलियुगाच्या या धर्मग्लानीसमयी अन्याययुक्त विश्वाचा विनाश करून न्याययुक्त विश्वाची निर्मिती करण्यासाठी परमात्मा अर्थात विश्वाचा न्यायाधीश अवतरित झाला आहे. त्याच्या न्यायमंदिरात अंतिम न्यायनिवाडा होत असतो परंतु सर्वसामान्य माणसाला ते समजत नाही. या न्यायनिवाड्याविषयी म्हटले जाते की 'भगवानके घर देर है, मगर अंधेर नही है।' असुरी गुणांमुळे विश्वात अशांती तर दैवी गुणांमुळे विश्वात शाश्वत सुख-शांती नांदू शकते. त्यासाठी आवश्यकता आहे दैवी गुण धारण करण्याची. **असे दैवी गुण धारण करण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालयासारखा अन्य कोणताच सत्संग नाही.** या विद्यालयाच्या शाखा बहुतांश विदेशात व देशात स्थापन झाल्या आहेत. या विद्यालयाचा परिचय सर्वांना व्हावा म्हणून 'पीस ऑफ माईंड' या टि.व्ही. चॅनलद्वारे विद्यालयाचे भिन्न-भिन्न कार्यक्रम दाखविले जातात. या विद्यालयास आंतराष्ट्रीय

▶ पान क्र. १६ वर



# तुझ्या मुरलीचे वेड मज लागले

(अनुभव) *ब्र.कु.दत्तात्रय उढावे, वसंतनगर - नांदेड.*

भक्तिमार्गात भागवतात श्रीकृष्णाच्या मुरलीचे अतिशय सुंदर शब्दात वर्णन केले आहे. श्रीकृष्णाच्या मुरलीची मधुर तान ऐकताच गोपी देहभान विसरून जात असत आणि हातातील सर्व कामे सोडून तहान-भूक विसरून मुरली ऐकण्यासाठी घराबाहेर पडत असत. मुरलीचे स्वर सर्वांच्या मनाला मंत्रमुग्ध करीत असत. त्यांनी पशु-पक्षी देखील आकर्षित होत असत. गाई-वासरे सुद्धा श्रीकृष्णाच्या बासरीने त्याच्याभोवती जमा होत असत. अशाप्रकारे संपूर्ण चराचराला चैतन्याने, आनंदाने, प्रसन्नतेने, प्रभूप्रितीने पुलकित करणारी अशी ही मुरली होय. वास्तविक भागवतातील हे वर्णन संगमयुगातील ईश्वरी ज्ञान मुरलीची यादगार आहे. **आता संगमयुगात जे ईश्वरी चरित्र आपण ब्रह्मावत्स अनुभवतो तेच नंतर भक्तिमार्गात निरनिराळ्या शास्त्रातून रुपकात्मक रीतीने, रोचक कथांच्या रूपाने लिहिले जाते. भागवत वर्णित श्रीकृष्ण हे निराकार शिव परमात्म्याचे प्रतीक आहे. तसेच परमात्मा ब्रह्मामुखाद्वारे जे ज्ञान देतात त्याचे प्रतीक मुरली आहे व आपण ब्रह्मावत्स त्या ज्ञान मुरलीवर आकर्षित होऊन, देहभान विसरून जातो, याची यादगार भागवतातील गोपिका आहेत.** त्याचबरोबर या सर्व गोपींमध्ये श्रीकृष्णाला अतिप्रिय अशी जी राधा होती, जी मुरलीची सर्वाधिक बावरी होती, ती प्रतीक आहे यज्ञमाता सरस्वतींचे. अशाप्रकारे भागवत शास्त्र हे आत्मा व परमात्मा यांच्यातील पवित्र प्रेमावर आधारीत असे शास्त्र आहे. तात्पर्य म्हणजे आता संगमयुगात जे घडते, त्याचीच यादगार भक्तिमार्गात प्रतीकात्मक रूपाने वर्णन करण्यात येते.

मी रोज जेव्हा मुरली श्रवण करतो तेव्हा मन अत्यंत पुलकित होऊन जाते त्यामुळे ती पुन्हा-पुन्हा श्रवण कराविशी वाटते. त्यातील एक-एक महावाक्य हे संजीवनी बुटीचे काम करते. मुरली ब्राह्मण जीवन प्राण आधार आहे, आत्म्याचे भोजन आहे, नराला नारायण बनविणारी आहे. भक्तीचे फळ ज्ञान प्रदान करणारी आहे. ज्ञान मुरली हीच खरी गीता आहे. मुरलीद्वारेच परमात्मा श्रीमत (अर्थात श्रेष्ठ मत) देतात व श्रीमतानुसार आचरण केल्यानेच मनुष्य सतोप्रधान बनतो. **अशा मुरलीचे वेड मला जसे लागले आहे तसे ते प्रत्येक आत्म्याला लागावे, असे मला वाटते कारण त्यातच आत्म्याचे परमकल्याण आहे. संपूर्ण कल्पात फक्त आता संगमयुगातच डायरेक्ट परमात्म्याची महावाक्ये मुरलीद्वारे आपल्या कानी पडतात.** स्वयं परमात्मा शिवपिता परमशिक्षक बनून रोज आपल्याला शिकवितात. मुरलीतून रोज नवीन वरदान देतात. त्यामुळे संगमयुगातील प्रत्येक दिवस म्हणजे एक महान पर्वणी आहे. ज्ञान खजिन्यांनी आपला बुद्धीरूपी कलश भरण्याची हिरेतुल्य संधी आहे. सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे मुरलीच्या शेवटी बापदादा आपल्या प्रिय मुलांना यादप्यार तर देतातच परंतु नमस्ते ही करतात. तेव्हा लक्षात येते की परमात्मा सर्व शक्तिवान असूनही किती निरहंकारी आहे. आपल्याला देखील बापसमान निरहंकारी बनायला हवे. वास्तविक संगमयुगात आपण आपले तन-मन-धन शिवबाबांना अर्पण केले आहे. (याचेच प्रतीक म्हणून भक्तिमार्गात शिवलिंगावर तीन पानाचे बेलपत्र वाहतात.) मग अहंकार तो कसला? अशारीतीने मुरली ही आपल्याला निराकारी, निर्विकारी व निरहंकारी स्थिती बनविण्याची रोजच प्रेरणा देत असते. मुरलीद्वारे माझ्या अलौकिक जीवनात किती झपाट्याने परिवर्तन होत गेले हे आपल्या लक्षात यावे यासाठी माझ्या लौकिक जीवनाचा संक्षिप्त वृत्तांत आपल्यापुढे ठेवत आहे.

### ❑ मी ज्ञानात कसा आलो?

पाचलेगावकर महाराजांच्या मुक्तेश्वर आश्रमाचा संचालक या नात्याने गेली ३० वर्षे मी काम करीत होतो. तेथे शिवरात्री निमित्त ईश्वरी संदेश देण्यासाठी ब्रह्माकुमारी भगिनी आल्या होत्या. त्यांनी माझ्या संमतीने तेथे आध्यात्मिक प्रदर्शनाचे आयोजन केले. सर्वांना प्रदर्शनाच्या माध्यमातून ईश्वरी ज्ञान दिले. मलासुद्धा त्यांनी प्रदर्शन समजावून सांगितले. मला ते ज्ञान आवडले. विशेष म्हणजे

इतक्या लहान बहिणी एवढ्या सहजतेने तसेच अधिकारवाणीने ईश्वरी ज्ञान समजावून सांगताना पाहून आश्चर्य वाटले त्यामुळे ब्रह्माकुमारीज् संस्थेचे विशेष आकर्षण वाटू लागले.

पुढे जेव्हा मी पहिल्यांदा सेवाकेंद्रावर आलो तेव्हा कुणीतरी माझ्या मस्तकावर हात फिरवत असल्याचा भास झाला. पिताश्री ब्रह्माबाबांचा तो वरदहस्त असावा. मी मोठ्या आनंदाने साप्ताहिक कोर्स पूर्ण केला व नियमितपणे मुरली ऐकण्यासाठी सेवाकेंद्रावर येऊ लागलो. त्यानंतर लवकरच एप्रिल २०१३ मध्ये मला मधुबनला जाण्याची संधी प्राप्त झाली. **तेथील वातावरण म्हणजे या भूतलावरील स्वर्गच होय. तेथील पवित्र, अलौकिक, दिव्य वातावरणात माझे मनच नव्हे तर सारे जीवनच बदलून गेले.** मी ज्ञानात आल्यानंतर माझे तंबाखूचे व्यसन काही केल्या सुटत नव्हते. घरातील सर्वजण मला विरोध करीत परंतु मी कुणालाच जुमानत नसे. मला दिवसा तंबाखू खाऊ दिली नाही तर मी रात्री तंबाखू खात असे. अशारीतीने मी त्या व्यसनाचा गुलाम बनलो होतो. परंतु मधुबनला गेल्यावर बाबांच्या कमऱ्यात ठेवलेल्या पेटीत एक चिठ्ठी टाकली. त्यात बाबांना विनंती केली होती की बाबा, मला तंबाखूच्या व्यसनातून मुक्त करा आणि आश्चर्य म्हणजे त्या क्षणापासून मी तंबाखूच्या व्यसनातून मुक्त झालो.

असे अनेक अनुभव ज्ञानमार्गात आल्यानंतर मला होत गेले. फलस्वरूप शिवबाबांवरील निश्चय दृढ होत गेला. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे दैनंदिन मुरलीच्या माध्यमातून शिवबाबांशी थेट संवाद साधला जात असल्याने माझी झपाट्याने आध्यात्मिक उन्नती होत गेली. वास्तविक मुरली म्हणजे जणू शिवबाबांनी आपल्या लाडक्या मुलांना पाठविलेले चार पानाचे प्रेमपत्र आहे. त्यातील प्रत्येक शब्द आपल्या हृदयाला जाऊन भिडतो. त्यामुळे विषय-विकारांच्या बंधनातून आत्मा मुक्त होत जातो.

### ❒ मुरली मराठीत अनुवादित केल्यास अत्यानंद

असे हे प्रभू प्रेमपत्र (अर्थात मुरली) जर आपल्या मराठी मायबोलीत असेल तर ग्रामीण भागातील जनतेला याचा खूपच फायदा होईल, असे वाटते. कारण आजही महाराष्ट्रातील बरीच जनता ही हिंदी भाषा तितकीशी नीटपणे जाणत नाही. त्यांच्यासाठी मराठी भाषेतून मुरली जर उपलब्ध झाली तर मराठी भाषिकांसाठी ही बाब अत्यानंदाची ठरेल. या दृष्टीने विचार व्हावा. गीतेतील आध्यात्मिक ज्ञान संस्कृत भाषेत असल्याने, संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहून मराठी भाषेचा मान वाढवला. तसेच संगमयुगात ईश्वरी सत्य गीता ज्ञान (अर्थात मुरली) मराठी भाषेतून प्रसारीत करून मराठी भाषेला सन्मानित करावे व मराठी जनतेला उपकृत करावे. ज्याप्रमाणे आंध्रप्रदेशातील जनतेसाठी कानडी भाषेत मुरली प्राप्त होते तशी महाराष्ट्रातील जनतेला मराठीतून प्राप्त झाली तर ग्रामीण जनतेला त्याचा खूप फायदा होईल.

**आता नुकतेच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दिनांक २७ फेब्रुवारी २०१४ रोजी अमृतकुंभ द्वैमासिकाद्वारे जी वेबसाइट उघडण्यात आली व जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात मराठी भाषिकांसाठी ईश्वरी ज्ञान उपलब्ध करून देण्यात आले. याचा मला खरोखर अतिशय आनंद व अभिमान वाटतो. त्यातून अनेक मराठी भाषिकांना नक्कीच फायदा होत असेल तसाच प्रयत्न मुरलीच्या बाबतीत करण्यात यावा.** किमान दरवर्षीच्या अव्यक्त मुरलींचा अनुवाद मराठीत करून त्याची एक वेबसाइट उघडण्यात यावी असे माझे मनोगत आहे. सध्याच्या विज्ञान युगात तीव्र गतीने सेवा करण्याचे हे साधन म्हणून नक्कीच सिद्ध होऊ शकेल, असा विश्वास वाटतो. ❖❖❖

---

▶ पान क्र. १४ वरून

स्तरावर अनेक महत्वपूर्ण पुरस्कार मिळालेले आहेत. मानवमात्रास संपूर्ण चारित्र्यवान अर्थात सर्वगुण संपन्न देवता बनवून भारतात सत्ययुगी स्वर्गाची स्थापना करणे हा एकमेव उद्देश या विद्यालयाचा व परमात्म्याचा आहे. **या विद्यालयाने चंबळ खोऱ्यातील भूतपूर्व डाकू पंचमसिंग याचे जीवन परिवर्तन घडवून आणले आहे. जर एक डाकू राजयोगी बनू शकतो तर सर्वसामान्य मनुष्य निश्चितपणे राजयोगी बनू शकेल.** त्यासाठी या विद्यालयात श्रद्धेचे व निश्चयाचे पहिले पाउल ठेवणे मात्र आवश्यक आहे. बंधूंनो, मानवमात्राचे सर्वोच्च कल्याण होण्याचा हाच तो बहुमूल्य समय आहे. ❖❖❖

# आत्म्याचा अंत समयीचा संघर्ष

*ब्र.कु.डॉ.दिलीप कौंडिण्य, घोडपदेव (मुंबई).*

आज बुद्धिबळ हा खेळ बऱ्याच अंशी चर्चेत आहे. बुद्धीचे बळ वापरून या खेळात बाजी जिंकता येते किंवा उलटविता येते. परमेश्वराने दिलेल्या अफाट बुद्धीचा प्रयोग एका मर्यादित क्षेत्रात, बुद्धिबळाच्या पटाएवढ्या जागेत फारच सीमित आणि क्षणिक विजयाच्या पूर्ततेकरिता केला जातो. याचे कारण म्हणजे आध्यात्मिक अज्ञान आणि सार-असार बुद्धीचा अभाव आहे. मनुष्य जन्माचे अंतिम ध्येय म्हणजे नेमके काय तसेच या अंतिम ध्येयाच्या पूर्ततेकरिता काय विधी आहे आणि ही विधी नेमकी कोणाकडून समजून घ्यावी, याबाबत सर्वत्र अज्ञान आहे.

आध्यात्मिक अज्ञानामुळे माणसाची बुद्धी भरकटत आहे, भ्रष्ट होत आहे आणि अनेक गुरु व पंथ यांच्यामुळे भ्रमित होत आहे. या भ्रमित अवस्थेत मी स्वतः एकंदर बारा पंथांचा अनुभव घेतला आहे. पण परम दयाळू परमेश्वराने हात दिला, सोबत दिली आणि या मनुष्य जन्माचे पूर्ण बारा वाजण्याच्या अगोदर मला तारून नेले. दिशा व ध्येय स्पष्ट झाले, **अंतिम ध्येयाच्या पूर्तीकरिता नेमका कोणता पुरुषार्थ करावा आणि सिद्धी करिता कोणती विधी आत्मसात करावी हे साक्षात परमेश्वराने ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रात रोज वाचण्यात येणाऱ्या मुरलीद्वारे सुस्पष्ट व सहज करून टाकले**. अमृतवेळी सकाळी चार वाजता एक तासाच्या राजयोगाच्या नियमित प्रयोगाद्वारे माझे स्वतःचे सात असाध्य रोग दूर झाले. वाचा सिद्धी व संकल्प सिद्धींची प्रचिती येऊ लागली. अनुभवाद्वारे कळले की संकल्प सिद्धी व वाचा सिद्धी तेव्हाच प्राप्त होते जेव्हा संकल्प श्रेष्ठ असतील, निरपेक्ष भावनेने दुसऱ्यांच्या हिताकरिता केलेले असतील, परम आत्मा शिवबाबाने घालून दिलेल्या श्रीमताचे उल्लंघन झाले नसेल व जेव्हा संकल्पात देखील संपूर्ण पवित्रता असेल. आश्चर्य म्हणजे सिद्धी देणारी ही विधी जगातील १३७ देशांतून ८५०० सेवाकेंद्रांमार्फत अगदी मोफत शिकविली जाते.

राजयोगाच्या तपस्येनंतर एक फारच महत्वाची माहिती अचानक डोळ्यासमोर आली. सदर बाबीची चर्चा प्रस्तुत लेखात आहे. जीवनाच्या खेळींपुढे बुद्धिबळातील खेळी आणि विजय फार मामुली बाब आहे, हे लक्षात आले. बुद्धिबळ व जीवन दोन्ही क्षेत्रात अंतिम युद्ध फार महत्वाचे असते. सुरवातीच्या खेळात तुम्ही कितीही निपुण असला तरी अंत समयीचे युद्ध तुमचा विजय किंवा पराजय निश्चित करते, हे आज विश्वविक्रमी आनंदच्या देखील लक्षात आलेले आहे. आता, इतक्या उशिरा सदर जाणीव झाल्याने ती उपयोगी पडते किंवा निकामी ठरते हे काळच ठरविल. सर्व आत्मांचा परमपिता, परमशिक्षक व परम सद्‌गतीदाता मात्र वारंवार मुरलीच्या माध्यमातून सांगत आहे की 'आताच मी काय म्हणतो ते जाणून घ्या, समजून घ्या आणि पूर्ण भान व श्रद्धेने करायला लागा. यामुळे तुमच्या जन्मजन्मांतरातील साठलेल्या विकर्मांचा बोजा जळून भस्म होईल जेणेकरून आत्म्याचा अंत समयीचा संघर्ष खूप लांबणार नाही. धर्मराजाद्वारे सुळाची शिक्षा मिळणार होती, ती काट्यावर निभावून जाईल किंवा काटा लागणार असला तर तो देखील लागणार नाही.' (पवित्र कुराण याबद्दल फार ठामपणे फर्मान करते, 'ज्याने अल्लाताला वा ईश्वरावर विश्वास ठेवला तो तरला, नाहीतर मेलाच म्हणून समजा.')

**जन्म आणि मृत्युच्या दरम्यान केव्हातरी अंतिम संघर्ष घडतो. सदर संघर्षाच्या व्याप्तीप्रमाणे मनुष्य जातीचे पाच संवर्गात विभाजन करता येईल -**

१) काही मनुष्य जन्म घेताच यातना व दुःखांना सामोरे जातात. अनुवांशिक व्याधीमुळे दुर्धर शस्त्रक्रियेचा योग येतो. शरीर भोगत असते, आत्मा तडपत असतो.

२) दुसऱ्या गटातील मनुष्य जीवन अगदी अल्पावधित थेलोसेमिया किंवा डायबेटीस घेऊन वावरायला लागतात. वारंवार घ्यावी लागणारी इंजेक्शने किंवा औषधे यांनी सदर व्यक्ती व आई-बाप यांना व्यथित, विदीर्ण करून टाकतात.

३) तिसऱ्या गटात असे लोक मोडतात ज्यांना भर तारुण्यात हृदयरोग, कॅन्सर, बुद्धिभ्रंश, उच्च रक्तदाब आणि तत्सम असाध्य रोग, जीव नकोसा करून टाकतात.

माणूस गोळ्या जास्त आणि पोळ्या कमी असा आहार बळजबरीने घ्यायला लागतो. जीवनातील उत्साह, सळसळणारे तारुण्य आणि आनंद नाहीसा होतो. नैराश्य येते.

४) चौथा गट आपल्यासारख्या अधिकांश लोकांचा आहे. जीवन ऐश आणि आरामाचे असते. छान घर, सुंदर सुग्रण व सुस्वभावी तुमचे ऐकणारी पत्नी व हुशार, कुशाग्र बुद्धीची सुंदर नातवंडे, कशाच प्रकारची कमतरता नाही. असे सहज सुंदर जीवन परमेश्वराकडून मागील जन्मांतील चांगल्या कर्मामुळे मिळालेले असते. **इतके सर्व भरगच्च असताना देखील मन म्हणते जे पाहिजे ते मिळालेच नाही, हा असंतोष मनात ठेऊन मग व्यक्ती कधीही न संपणाऱ्या आणि कधीच समाधान न देणाऱ्या एका जीवघेण्या स्पर्धेत सामील होतो. याला गळेकापू स्पर्धा म्हणतात.** मग ही व्यक्ती दुसऱ्यांचा गळा कापण्याच्या नादात स्वतःचाच गळा केव्हा कापून घेते हे तिच्या लक्षातच येत नाही. माणूस खूप चतुर आहे पण सारासार बुद्धी मात्र नाही. मग सदर व्यक्ती दुर्व्यसन, भ्रष्टाचार, व्यभिचार इत्यादी अजगराच्या विळख्यात स्वतःला स्वखुशीने आवळून घेते. या मार्गाला 'प्रेयस मार्ग' असे म्हणतात. विभिन्न आकर्षणे, प्रलोभने व वासना प्राण शक्तीचा ऱ्हास घडवून आणतात. मग वेगवेगळ्या असाध्य व्याधींचे दुष्टचक्र सुरू होते. 'क्रॉनिक फटीग सिन्ड्रोम' अशी एक असाध्य व्याधी आहे. यात माणूस कायमचा दम सोडेपर्यंत दमलेलाच असतो. शक्तिवर्धक गोळ्या, पेय, टॉनिक काहीच काम करीत नाही. डिप्रेशन-अफाट नैराश्य, वैफल्य, भय व चिंता यामुळे गोड खाण्यास सुरुवात होते. कारण गोड खाल्ल्यामुळे नवचैतन्य आणणारे स्त्राव अल्प काळाकरिता मेंदूत पाझरायला लागतात. लवकरच अमाप लठ्ठपणा येतो, रक्तदाब, हृदयरोग किंवा संधीवात निर्माण करतो. व्यक्ती मरणाच्या दाराकडे कळत-नकळत सरकत जाते. या दरम्यान विभिन्न उपचार, रुग्णालये आणि विशेषज्ञ आपला पार्ट उरकून टाकतात. जीवन भकास व नीरस होऊन जाते. मरण म्हणजे सुटका असे स्वतःलाच वाटू लागते. मग तीळ-तीळाने मरण केव्हातरी येते.

५) पाचव्या प्रकारचा अंतिम संघर्ष म्हणजे भगवद्गीतेतील कर्माच्या सिद्धांताचा कळस आहे. जीवनभर सरळ मार्गाचा अवलंब केलेला असतो. रोज पाच-दहा मिनिटे का होईना देवापुढे प्रार्थना केलेली असते. सत्यनारायण, एकादशी, कार्तिकी, श्रावण सोमवार, इत्यादी शास्त्रसंमत धर्म पाळलेला असतो. आपण या जन्मी तरी चांगलेच केले आहे, काही पाप केले नाही असा वृथा अभिमान असतो. **पण सध्याच्या संगमयुगात कोणा एका व्यक्तीमार्फत मिळालेला साक्षात परमेश्वराकडून आलेला वा मिळालेला संदेश अंतर्मनापर्यंत जात नाही. ब्रह्माकुमारीजच्या प्रत्येक केंद्रात मोफत मिळणारे, साक्षात परमेश्वराकडून मिळणारे ज्ञान आणि कर्मभोग संपविण्याची विधी हसण्यावारी घेण्यात येते. वारंवार परमेश्वरी संदेश मिळून देखील अपेक्षित कृती घडत नाही. विकर्मांचा सर्व भार आहे तसाच राहतो. किंबहुना वाढतच जातो.** अज्ञानी व्यक्तीला याबाबत कसलीच जाणीव होत नाही. आधी दुर्धर अंथरुणाला खिळवून ठेवणारे आजार होतात तरीदेखील जाणीव जागी होत नाही. योग घडत नाही. लवकरच असहाय्य स्थितीत व्यक्ती वृद्धाश्रमात दाखल होते. भारतात चांगली व्यवस्था असणारे वृद्धाश्रम अपवादानेच आढळतात. मग एक दुर्धर कुचंबणा सुरू होते. कित्येकदा स्वतःच्या मलमूत्रातच बऱ्याच वेळाकरिता पडून रहावे लागते कारण सफाई कामगार चिरीमिरी शिवाय जागेवरून उठत देखील नाही. कालांतराने अचेतन अवस्था येते. मनुष्य मग कोमा मध्ये कित्येक महिने देखील काढतो. अधून-मधून येणाऱ्या चेतन अवस्थेत बोलणी ऐकू येतात. 'म्हातारा धड रहात पण नाही व लवकर जात पण नाही.' वगैरे, वगैरे.

जेव्हा कोणी मोठी व्यक्ती कोमात जाते तेव्हा लोक कौतुकाने म्हणतात, 'बघा, काय अचाट इच्छा शक्ती आहे. साक्षात मृत्युशी झुंज देत आहेत.' परंतु यामागील खरी गोम अशी आहे की सदर व्यक्ती मृत्युशी झुंज देत नसते. ती व्यक्ती अशा अवस्थेत आपले कर्मभोग भोगत असते. जेव्हा तिला हे असह्य होतं; तेव्हा तो आत्मा मरणाची मागणी करायला लागतो. पण त्याची मागणी कर्मभोग संपेपर्यंत मान्य होत नाही. सबब मृत्युशी झुंज नाही तर मृत्युची मागणी घडते.

ज्ञानमुरली सांगते की, जन्मजन्मांतरीचे विकर्म, भोग बनून जीवनात येतात. (प्रामुख्याने चार प्रकारचे भोग

असतात - तन, मन, धन व जनाचे) मनाला यातना तेव्हा होतात जेव्हा दुसरे तुमच्या मनाप्रमाणे वागत नाहीत. त्यामुळे आज परिस्थिती अशी आहे की, बायको म्हणते, नवरा माझे ऐकत नाही. नवरा म्हणतो, बायको माझे ऐकत नाही. नवरा-बायको दोघे मिळून म्हणतात आमची मुलं आमचे ऐकत नाहीत आणि मुलं म्हणतात, आमचे आई-बाप आमचे ऐकत नाहीत. सारांशाने, माझे आणि मीपणातून घरोघरी अशांती आहे, भांडणे होतात. अशाप्रकारे सर्व काही व्यवस्थित असताना देखील मनाला शांती नाही हा देखील एक प्रकारचा नरकवास आहे.

**परमात्मा शिवबाबा सांगत आहेत की भोग संपविण्याचे फक्त दोन मार्ग आहेत, १) जीवनभर भोग भोगत जाणे, २) एकाग्रचित्त होऊन स्वतःला बिंदूरूप आत्मा समजून बिंदूस्वरूप परमपित्याची प्रेमपूर्वक आठवण करणे. सदर योग अगदी नियमितपणे रोज सकाळी चार वाजता एक तासाकरिता विधीपूर्वक केल्यास सर्व कर्मभोग जळून भस्म होतात.** फक्त तीन महिन्याच्या अवधीतच सर्वप्रकारच्या व्याधी नेहमीकरिता दूर होऊन जातात. सुप्रिम सर्जन शिवबाबांचे औषध म्हणजे मेंदूतून झिरपणारे संजीवनी स्त्राव सदर किमया करतात. ऐनकॅफेलिन हृदय धमनींतील अवरोध दूर करतो. रक्तातील साखर, फॅट आणि क्षाराचे संतुलन निर्माण करतो आणि कॅन्सरच्या पेशींना खाऊन टाकण्याच्या नॅचरल किलर सेलला अचाट शक्ती प्रदान करतो. एन्डोर्फिन नैराश्य दूर करतो व नवीन चैतन्य देतो. मेलाटोनीन निद्रानाश दूर करतो. बी.डी.एन्.एफ्. बुद्धिभ्रंश होऊ देत नाही. स्टेम सेल ॲक्टीवेशन फॅक्टर (सिद्धांत रूपात) म्हणजे एक आश्चर्य आहे. शरीरातील कोणता अवयव निकामी झाला असल्यास त्याला पुनर्जीवित करतो. सदर परमेश्वराची स्टेम सेल थेरेपी मोफत आहे तसेच सर्व मानव जातीकरिता आहे. आज स्टेम सेल थेरेपी करिता लागणारा खर्च लाखो रूपयात आहे. फक्त करोडपती लोकच या महागड्या थेरेपीचा लाभ घेऊन संधीवात इत्यादी व्याधींतून मुक्त होऊ शकतात. पण यातदेखील एक गोम आहे. जर कर्म चांगले नसेल, कर्मभोग संपला नसेल तर लाखो रूपये देखील वाया जातात. अपेक्षित लाभ मिळत नाही.

माझ्यापुरता एक परमेश्वरी सिद्धांत सिद्ध झालेला आहे. माझा प्रत्येक असाध्य आजार एक कर्मभोग होता. कर्मभोग योगाद्वारे भस्म झाल्याबरोबर संबंधीत आजारापासून मला संपूर्ण मुक्ती मिळाली. **जर आपला विश्वास बसत नसेल तर राजयोग फक्त तीन महिन्यांकरिता विधीपूर्वक करून स्वतः अनुभव घ्या. सर्वकाही आपोआप समजून येईल, उमजून जाल. खरंच स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही.**

❖❖❖

▶ पान क्र. ७ वरून

***सृष्टी नाटकाची स्मृती :*** अतींद्रिय सुखात रमण करण्यासाठी सृष्टी नाटकाचे रहस्य स्मृतीत ठेवणे सुद्धा गरजेचे आहे. ही सृष्टी एक पूर्वनियोजित अनादी नाटक आहे, यात जे काही होत आहे ते पूर्वनिश्चित असून नियमानुसार होत आहे. अशी स्मृती ठेवल्याने सर्वप्रकारच्या परिस्थितीत माणूस स्थिर, एकरस वा निश्चिंत राहतो आणि अतींद्रिय सुख अनुभवतो तो आपल्या परीने पुरुषार्थ तर पूर्णपणे करतो पण त्याचा जो परिणाम होतो त्यात तो संतुष्ट राहतो व याला एक खेळ अथवा नाटक जाणून सदा खुश राहतो.

***ज्ञानसेवा :*** याशिवाय जो दुसऱ्यांची ज्ञानसेवा करतो, ईश्वरी नियम पाळत असताना संगमयुगाच्या स्मृतीत तसेच ब्राह्मण कुळाच्या तथा आपल्या सर्वश्रेष्ठ ईश्वरी संबंधाच्या स्मृतीत राहतो तो सदा अतींद्रिय सुखात राहतोच. तसेच जो दुसऱ्यांची जितकी ज्ञानसेवा करतो आणि त्यांना जितके सुख देतो, तितकेच अधिक त्याला अतींद्रिय सुख मिळते हे निश्चित आहे. त्यांचे शुभाशीर्वादही त्याला मिळतात.

***त्याग आणि अर्पणमयता :*** परंतु अतींद्रिय सुखाचे सर्वात मोठे साधन आहे, त्याग. ज्याच्या जीवनात त्यागाचा जितका अधिक गुण असतो, तितकाच तो सुखी व निश्चिंत असतो. तसेच जो आपले सर्वकाही प्रभू अर्पण करून विश्वस्त (trustee) तसेच अनासक्त होऊन ईमानदारीने तथा पवित्र मनाने वागतो, त्याला तितकेच अधिक अतींद्रिय सुख प्राप्त होते. **ही साधने लक्षात ठेऊन आता प्रत्येक ब्रह्मावत्साने अतींद्रिय सुखात रमण करायला हवे कारण या सुखाच्या प्राप्तीसाठी हे संगमयुग खरं तर एकमेव पर्वणी आहे. 'आता नाही तर कधीच नाही'.** ***(आधार : ज्ञानमाला, भाग -१).***

# माझी गीता माऊली, देई कल्पवृक्षाची सावली

(भाग - १)

*ब्र.कु.गुणवंत पाटील, पुणे.*

**गीता ज्ञान दाता एक परमात्मा शिव आहे. तोच विश्वाचा विश्वंभर आहे. या विश्वनाथाचे अध्यात्म आहे गीता. हा विश्वनाथ विश्वासाठी शिव आहे तर आम्हा ब्रह्मावत्सांसाठी परमपिता शिव बाबा आहे. आम्ही त्या शिव बाबांचे पुत्र आहोत. त्याच्या सत्ययुगी स्वर्गाचे अधिकारी आहोत. शिव बाबा आमचा पिता आहे तशी आईही आहे. आम्हा पतित दुःखी अशांत आत्म्यांचे अश्रू पुसण्यासाठी ही आई अवतरित झाली आहे. आम्हा लेकरांना कडेवर घेऊन गीतेची अंगाई, मुरली रोज ऐकवित आहे. या मुरलीने, गीतेने आमचा उद्धार, कल्याण होत आहे.**

आजच्या भौतिक जगात दुःख, अशांती वाढली आहे. क्षणिक सुखासाठी तळमळणारे दुःखी, कष्टी आत्मे कलियुगी तथाकथित साधु-गुरूंचे उंबरठे झिजवित आहेत. पण सगळी-कडे भ्रमनिरास, फसवणूक झाल्याने त्यांची हताशा, अवसाद, (depression) अशांती वाढली आहे. आत्मघाताचे विचार त्यांना प्रभावित करीत आहेत. अशा आत्म्यांना नवी दिशा, नवी दृष्टी, उमेदीचे नवे किरण, ज्ञानसूर्य शिवाची गीता-मुरलीच देऊ शकते. का जगावे, कसे जगावे याचे अज्ञानच आज दुःखाचे कारण बनले आहे, कर्मे बिघडली आहेत. सारासार विवेक लोपला आहे. अवास्तव इच्छा-आकांक्षा, हव्यास, लोभ वाढला आहे. ईर्ष्या, द्वेष या अवगुणांनी बुद्धी मलीन झाली आहे. आत्म्याचा सर्वत्र दरवळणारा सुगंध म्हणजे गुण यांचीच फारकत झाली आहे.

विषादाने तन आणि मन दोन्हीही प्रभावित झाली आहेत. कर्तव्यनिष्ठेला ग्रहण लागले आहे. अपयशाचे प्रमाण वाढल्याने जगण्याची उमदेच खचली आहे. हृदयगती तेज होणे, रक्त-दाब वाढणे, घाम येणे, मांसपेशीत तणाव निर्माण होणे अशा शरीरव्याधींनी त्रस्त केले आहे. हा धोक्याचा इशाराच आहे. त्यामुळे शरीराबरोबर मानसिक पीडाही वाढली आहे. शक्तींचा ऱ्हास झाला आहे. जगण्यातील अगतिकता वाढल्याने आता आत्मपरिवर्तनाची गरज निर्माण झाली आहे. परि-स्थितीवर मात करण्यासाठी आत्मबल वाढले पाहिजे. आत्मबल समर्थ असेल तर तणावमुक्ती सहज होईल.

ईश्वरी ज्ञान हाच जीवन जगण्याचा मंत्र आहे. या मंत्रातून आत्म्याला अंतर्मुखी होण्याची, सकारात्मक विचार, चिंतनाची दिशा मिळते. आशावादी भूमिकेतून शांत, स्थिर बुद्धीने, विवेकाने अनेक समस्यांचे ठाम समाधान शोधता येते. परमात्म्याची स्मृती, यथार्थ शरणता-समर्पण ही अनेक विघ्नांपासून मुक्ती देते. भय कमी होते. धैर्याने, संयमाने सामना करण्यासाठी उर्जा मिळते. ईश्वरीय सत्य-गीता ज्ञान ही संजीवनी बुटी आहे. हे ज्ञान कर्माचा आधार झाले की कर्म ही दिव्य होते, श्रेष्ठ होते. आपल्या तन-मनाच्या क्षमताही चमत्कार घडवितात.

परमात्म स्मृतीसाठी स्वपरिचय अर्थात आत्म्याची ओळख व्हावी म्हणून भगवंताने आत्मिक ज्ञान दिले. पण त्याच्या अभावामुळेच आजच्या विषम व विपरीत परिस्थितीत आत्मा शोकाकुल झाला आहे. आत्मविश्वास गमावल्याने घोर निराशा, उदासिनता अनुभवतो आहे. पण ही परिस्थिती तर कलियुगाचा धर्मच आहे, कलियुगाची परंपराच, नियतीच (destiny) आहे. त्यामुळेच या अकल्याणकारी, विघ्न, समस्यापिडीत वातावरणातही मनाची स्थिरता, समत्व प्राप्त करण्यासाठी आत्मज्ञान महत्वाचे आहे. हे ज्ञान साऱ्या घटनां-कडे साक्षी, निमित्त भावाने पहाण्याची नवी दृष्टी देते.

**आत्मा अमर, अजर, अविनाशी आहे. शरीर विनाशी आहे. जन्माप्रमाणेच मृत्यूही अटळ आहे. मृत्यूच्या रूपात आत्मा जीर्णवस्त्रे टाकून जन्मरूपात नवी वस्त्रे धारण करतो. हे सत्य क्रांती घडवते.** वाट्याला आलेली सुख-दुःखे हे भोग आहेत. माझ्या कर्मांचे विपाक आहेत. म्हणूनच ते आनंदाने, धैर्याने भोगली पाहिजेत व कर्मात श्रेष्ठता, दिव्यता कशी येईल याचेच चिंतन केले पाहिजे. त्यामुळेच आपल्या संकल्पात, विचारात व्यर्थापेक्षा, नकारात्मकतेपेक्षा विधायक सकारा-त्मकता कशी येईल याची दक्षता घेणे हीच आपली प्राथमिकता (प्राधान्य) राहावी, कारण जसे विचार करू तसे बनू. नकारात्मक, व्यर्थ विचार हेच तणावाचे मुख्य कारण आहे.

आपल्या इच्छा-आकांक्षा, जुने संस्कार आपली दिनचर्या, जीवनशैली प्रभावित करतात. त्या बिघडवण्याचे काम अधिक करतात. म्हणून परिक्षण-चेकींग करीत परिवर्तनाची दिशा निश्चित केली पाहिजे. आपले चिंतन आपली अवस्था बदलू शकते. अवस्था बदलण्यानेच व्यवस्था दुरूस्त होण्याची शक्यता वाढते. अन्यथा आपली पाटी कोरीच रहाते.

कर्म करताना फळाची अपेक्षा नसावी. हार-जीत, लाभ-हानी यांचा फारसा विचार न करता योग-युक्त स्थितीत, प्रभुस्मृतीत कर्म करावे म्हणजे पश्चात्तापाची वेळ येणार नाही. आपल्या कामना आपल्या दुःखाचे कारण बनू शकतात. म्हणून कोणत्याही परिस्थितीत लोभ, हव्यास न ठेवता संतुष्ट राहण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे. परमात्माच सर्व प्राप्तींचा स्त्रोत आहे. हे जाणून त्याची याद, स्मृती निरंतर केली पाहिजे. ही यादच खरा योग आहे.

**'योगः कर्मसु कौशल्यम्' असे गीतेत वचन आहे. आपल्या कामातील कुशलता, निपुणता, श्रेष्ठता हाच कर्मयोग आहे. निर्लोभी, अनासक्त, सदा प्रसन्न, संयमी, निष्कामी या भूमिकेतून कर्म करणाराच खरा कर्मयोगी आहे.** फलनिरपेक्ष आत्म्याची कर्मातील तन्मयता समाधीच्या कोटीची असते. कर्मयोगी देह-अभिमानी नसतो. तो आत्मनिष्ठ असतो. आपल्या कर्मेंद्रियांचा धनी असतो. संयमित बुद्धीने कर्मे करताना निमित्त भावाने देहाचाही योग्य सांभाळ करतो. यालाच स्वधर्माचरण म्हणता येईल. पण देहाचा नाश ही त्याच्या दृष्टीने शोचनीय गोष्ट नाही. मनुष्याचा जन्मच मुळी कर्म करण्यासाठी झाला आहे. कर्म हेच त्याचे वर्तमान व प्रालब्ध आहे. मग कर्म हीच त्याची विवशता असेल तर ते श्रेष्ठ, यथार्थ, कल्याणकारी अर्थात प्रभुसमान का होऊ नये हा अमृत विचार आहे. कर्माचे फल तर शेवटी प्रभुलाच अर्पण करण्यातच आपले दिव्यत्व आहे, श्रेष्ठत्व आहे.

कर्मानेच तणावही निर्माण होतात. म्हणून कर्म विचार-पूर्वक करावे. अनासक्त बुद्धीने करावे म्हणजे कर्मबंधन होणार नाही. प्रत्येक कर्म हे यज्ञ-कर्म आहे. कर्म एक साधना आहे, तपस्या आहे. त्यात साधनांचा आधार बनवू नये. कर्तव्य भावनेला, निष्ठेला केंद्रबिंदू मानून उच्च भावनेने कर्म केल्यास मोठा निर्भेळ आनंद मिळेल. कर्मातीत - फरिश्ता स्वरूप होण्याचा हाच मार्ग आहे.

राजा जनक, राजा असूनही जीवनमुक्त होता, विदेही होता. एका साधुने राजाला विचारले, 'तुम्हास विदेही का म्हणतात ?' राजा म्हणाला, 'याच उत्तर संध्याकाळी देईन. तोपर्यंत तुम्ही राजवाड्यात फिरून या. हा राजवाडा फारच सुंदर आहे त्याच कोरीव काम अप्रतिम आहे. पण तेथे नेहमीच अंधार असतो म्हणून तुम्ही दिवा घेऊन जा. तसेच दिवा शेवटपर्यंत विझणार नाही याची दक्षता घ्या.' राजवाडा पहाताना अचानक हवा सुटली. तेव्हा आता दिवा तर विझणार नाही या काळजीने साधु घाबरला होता. संध्या-काळी साधु राजाला भेटला. तेव्हा राजाने विचारल, 'कसा आहे राजवाडा ? त्याच शिल्प आवडल का ?' साधु म्हणाला, 'राजा माझं लक्ष तर दिवा विझू नये यावरच केंद्रित झालं होतं. मग कुठं पाहिलं नक्षीकाम.' राजा म्हणाला, 'साधु महाराज, मीही महालातच रहातो पण उपराम अवस्थेत.'

परमात्म्यालाच संसार मानून उपराम बुद्धीने कर्म केले तर कसले आले कर्मबंधन. स्वतःला आत्मा समजून ीमता-नुसार कर्म केले तर ते कर्म सुकर्म बनते, दुवापात्र होते. म्हणून खरं तर कोणतेही कर्म करण्यापूर्वी स्वतःला ३ प्रश्न विचारा.

१) खरोखरच ते कर्म करणे आवश्यक आहे काय ?

२) त्याचा स्वतःला, दुसऱ्याला फायदा होईल काय ?

३) ते कर्म ताबडतोब करण्याची निकड आहे काय ?

या प्रश्नांची होकारार्थी उत्तरे मिळाली तरच कार्य सिद्धीही होईल. कार्यसिद्धीचा, यशाचा संबंध कार्य तत्परतेशी तर आहेच पण त्याचा कार्यकारणभावही तेवढाच महत्वाचा आहे. कोणतेही कर्म करताना म्हणून हा कार्यकारणभाव तपासून पाहायला हवा.

परमात्म्याने कर्माच्या गुह्यगतिचेही ज्ञान दिले आहे. कर्माच्या सूक्ष्मतेची समज जेव्हा मिळते तेव्हाच श्रेष्ठ, यथार्थ कर्म करण्याचा प्रयास होतो. कर्माची गुह्यता स्पष्ट करताना परमात्मा म्हणतो, 'कलियुगाच्या अंती अर्थात कल्पाच्या अमृतवेळी पुरुषोत्तम संगमयुगात नव्या युगाची स्थापना व कलियुगी धर्मभ्रष्ट, कर्मभ्रष्ट दुनियेचा विनाश ही माझी दिव्य कर्तव्ये मी निर्विकारी, साक्षी, निमित्त भावाने करतो. ही कर्म मला बांधू शकत नाहीत म्हणून मी कर्मातीत आहे.

मी अकर्ताही नाही पण जन्म-मरणापासून मुक्त आहे. अभोक्ताही आहे कारण मला कुठलाही कर्मभोग भोगावा लागत नाही. म्हणूनच मी सदैव निराकारी, निर्विकारी व निरहंकारी आहे.

सृष्टिचक्राचे यथार्थ सत्य ज्ञान देताना ईश्वराने कर्म-सिद्धांताची व्यापक व्याख्या केली. द्वापर व कलियुगात सामान्यतः जी कर्म होतात ती विकर्मच आहेत. येणाऱ्या कल्याणकारी सत्य व त्रेतायुगात होणाऱ्या कर्मांचा हिसाब-किताब होणार नाही म्हणून ती अकर्मच होतील. आजमात्र कलियुगाच्या शेवटी संगमयुगात श्रीमतानुसार होणारी कर्म ही सुकर्म अर्थात श्रेष्ठ कर्मच आहेत. शुद्ध, पवित्र मनाने ही कर्म केल्यामुळे ती पुण्यप्रद आहेत.

खर तर सुख, शांती, प्रेम, आनंद, ज्ञान, शक्ती आणि पवित्रता हे आत्म्याचे स्वधर्म आहेत. या स्वधर्मात जगणेच अधिक श्रेयस्कर, हिताचे आहे. परधर्म (विकारवशता) फक्त इंद्रियांची तुष्टी करतो. म्हणून खऱ्या सुखाचे, अर्थपूर्ण आयुष्य जगण्यासाठी दरवाज्यावर पहारा असावा. सत्य ज्ञानालाच बुद्धीत प्रवेश द्यावा. नकारात्मक, व्यर्थ विचार मनाचे पावित्र्य घालवितात. ईश्वराने दिलेल्या श्रेष्ठ ज्ञाना-सारखी पवित्र गोष्ट जगात नाही. हे सत्यज्ञानच आपल्या चिंतनाची, कर्मांची, चरित्राची दिशा व दशा ठरवते. पतित आत्म्याला पावन करण्याची शक्ती या ज्ञानात आहे. आपल्याला जेव्हा हे उमजत की वर्तमान समस्यांचे, परिस्थितीचे कारण पूर्व संस्कार, कर्मच आहेत तेव्हा निश्चितच परिवर्तनाचा, आत्मोन्नतीचा मार्ग प्रशस्त होतो.

वर्तमानकाळ हा धर्मग्लानीचा आहे. यावेळी सुख, शांती, पवित्रता सारेच प्रायः लोप झाले आहे. हे अधःपतन आत्माही अनुभवतो आहे, याचीच परिणती ईश्वराची ओढ तीव्र होण्यात होते. आत्मा, परमात्म्याच्या भेटीसाठी व्याकुळ होतो. भगवंत आपल्या हृदयसिंहासनावर आरूढ झाला आहे; या दृढ निश्चयानेच त्याच्या अस्तित्वाची सुगंधी झुळूक आपल्या मनात लहरते. ईश्वरावर आपली गाढ आस्था आहे, निष्ठा आहे याचे हे प्रमाण आहे.

वर्षानुवर्षे रोज देवळात जाणाऱ्या एका मित्राला दुसऱ्या मित्राने विचारले, 'तू इतके दिवस देवळात जातोस तुला एकदा तरी देव दिसला का ?' तर मित्र म्हणाला, 'नाही'. 'मग तरी तू का जातोस ?' असं विचारल्यानंतर त्यानं सांगितलं, 'देव मला दिसला नाही. तरी मी जातो, हे देवाला दिसत ना !' हाच विश्वास, आस्था आपल्या मनातही असली पाहिजे.

**ईश्वरी ज्ञान ही खरी गीता साऱ्या जगासाठी आहे. आत्मशुद्धीसाठी, व्यवहारशुद्धीसाठी आहे. त्यामुळे विश्वा-तील सर्व आत्म्यांना ईश्वराचा परिचय, संदेश मिळावा ही परमात्मा शिव पित्याची तळमळ. प्रत्येक आत्म्याने आत्मानु-भूती, परमात्मानुभूतीचा खरा परमानंद घ्यावा ही तर त्या श्री. श्रींची इच्छा !** सच्चाई-सफाई भगवंताला आवडते. त्यामुळे जो स्वच्छ, शुद्ध मनाने, अंतःकरणपूर्वक त्याची यथार्थ याद करतो त्याला ईश्वरदत्त शक्तींची प्राप्ती सहजच होते. अशा आत्म्यावर मायेचे वार निष्प्रभ होतात. अशा अवगुण मुक्त आत्म्याच्या सेवेने इतरांचे कल्याण होते. अशा सेवेने निष्काम परमात्माही खुश होतो.

ईश्वरीय ज्ञानाचे तंत्र देऊन परमात्मा सद्‌गुरुने आम्हा ब्रह्मावत्सांना 'मन्मनाभव' हा प्रभूस्मृतीचा मंत्र दिला आहे. केवळ कर्महीन मंत्रालाही महत्व नाही तर हातानेही सेवा हवी आणि हृदयानेही सेवा हवी. आपण दैवी संस्कृतीचे रक्षक शिवाचे पुत्र आहोत. हे आपले मोठे दायित्व आहे. जेव्हा हे दायित्व निभावले जाईल तेव्हाच खरं तर परमात्म्याची प्रत्यक्षता होईल. ***(क्रमशः)***

## खरी अक्षर ओळख

शाळेत गेल्यावर मुलांना सर्वप्रथम वर्णमालेतील अक्षरांची ओळख करून दिली जाते कारण त्याशिवाय त्यांना पुस्तकी ज्ञान शिकता येत नाही. परंतु त्यांना खरी अक्षर ओळख मात्र शाळेत कधीच करून दिली जात नाही.

**वास्तविक 'अक्षर' या शब्दाचा अर्थच मुळी अविनाशी (अ+क्षर) असा आहे. आत्मा, परमात्मा व ड्रामा (सृष्टिचक्र) या तीन गोष्टी अक्षर अर्थात अविनाशी आहेत.** यांना यथार्थरित्या जाणणे हेच खरे अक्षर ज्ञान अथवा आध्यात्मिक ज्ञान आहे. ते ज्ञान वर्तमान संगमयुगात स्वयं परमशिक्षक शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालयाद्वारे देत आहेत. या ज्ञानामुळेच मनुष्य देवतातुल्य बनतो.

# वर्णमालेत गवसले जीवनमर्म

(भाग-१५)

*ब्र.कु.डॉ.संजय माळी, पाचोरा.*

**❑ ओ फॉर वन (One) अर्थात एक**

मित्रहो ! परमात्मा एक आहे. तो निराकार ज्योतिर्बिंदू-स्वरूप आहे. तो सत्य आहे, शिव आहे, सुंदर आहे. परमात्म्याची रचना तर बघा. एक आकाश, एक चंद्र, एक सूर्य, एक पृथ्वी, एक विश्व परिवार. आकाश जसे अमर्याद आहे तसा परमात्मा अमर्याद आहे, चंद्राप्रमाणे शीतल, सूर्याप्रमाणे प्रखर तेजस्वी आहे. धरती क्षमाशील म्हटली जाते तर भगवंत क्षमासागर आहे. प्रत्येकाची सर्व पापे धुऊन टाकतो. तारे जसे लुक-लुकून आनंद व्यक्त करतात तसा भगवंत नित्य परमानंदमय आहे.

एक शब्दावरूनच एकत्व किंवा एकता हे अर्थपूर्ण शब्द बनले आहेत. एक शब्दावरूनच एकरस अर्थात एका परमेश्वराच्या आठवणीत असणारा, एकाच ईश्वरावर प्रेम करणारा, भगवंताचा एकनिष्ठ सेवक. एक शब्दावरून एकसूत्र किंवा एकसूत्रता हा शब्द तयार होत आहे. कामात एकसूत्रता हवी. मग ते काम कसे एकदम छान होणार ! एकरूपता असली की कोणतेही काम सुंदर होते. एक परमात्म्याचे बळ पाठीशी असेल तर या जगात अशक्य असे काहीच नाही. एकबल, एकतत्व, एकभरोसा. एक शब्दावरून एकीचे बळ हा वाक्‌प्रचार रूढ झाला असावा.

श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलण्यासाठी आपली करंगळी लावली व गोप-गोपींनीही आपापली करंगळी टेकू म्हणून लावली असता सर्व मिळून तो पर्वत सहज उचलला गेला. तसे आपण करीत असलेले काम हे कोणाच्या घरचे काम नाही तर ते प्रभूचे काम आहे असा विचार करून यथाशक्ती ईश्वराच्या वा जनकल्याणाच्या कोणत्याही कार्यात सहभाग किंवा सहयोग नोंदवायला हवा. सामाजिक सहकार्य वृद्धींगत व्हायला हवे. वर्तमानकाळाची आज सर्वात मोठी गरज जर कोणती असेल तर ती म्हणजे सज्जनांनी संघटित झाले पाहिजे. संघटित रूपात असलेली ईश्वरीय शक्ती ही आसुरी शक्तीचा सहजच पराभव करू शकते. कोणतेही कार्य आपले स्वतःचे कार्य आहे असे समजून पार पाडले तर किती बरे होईल ? मलाच एकट्याला काय पडले आहे, किंवा माझ्या एकट्याने काय फरक पडणार आहे असा विचार मनातून काढून टाकला पाहिजे. अहो, तुम्ही जे करू शकता ते तुम्हीच करू शकता. दुसरा कोणीच ते करू शकणार नाही. तुम्ही अतिविशेष आहात हे लक्षात घ्या ना जरा !

**या जगात एका ईश्वराच्या अस्तित्वाची जाण होणे आणि त्याची भेट घडणे याहून मोठी दुसरी प्राप्ती नाही.** अनेकत्वामध्ये एकत्व पाहता येणे ही खरी बुद्धिमता आहे व ती भगवंताचीच कृपा असते. एक परमात्मा आणि एक आनंद हेच खरे जीवन आहे कारण प्रेम, शांती व आनंद इतर ठिकाणी कुठेच नाही. आम्ही शाश्वत आनंदाविषयी बोलत आहोत. भगवंताचा आनंद जाणून घ्यायला त्याच्या गावी जावे लागते, त्याच्याशी मैत्री करावी लागते किंवा एकतर त्याला हृदयात कैद करावे लागते. हो, अगदी खरे सांगत आहोत आम्ही ! **या जगातील सर्वांवर आईच्या ममतेने प्रेम केले तर त्याच्या गावी जाता येते. सर्वांना मित्रत्वाच्या भावनेने बघता आले की भगवंताशी आपली पटकन मैत्री होते आणि त्याच्यावर निस्सीम प्रेम केले की त्याला आपल्या हृदयात सहज कैद करता येते हे पण खरेच आहे.** आणि हो, आणखी एक गंमत आहे की ईश्वराला सज्जनाच्या हृदयात कैद व्हायला फार आवडते. एखादा दुकानदार जसा एखाद्या ग्राहकाला शोधतो ना तसा भगवंत योगी किंवा योग्य भक्तांचे हृदय ही रम्य शांतीची जागा शोधत असतो. एकदा का प्रभू हृदयात आले की मग आणखी काही करण्या-सारखे शिल्लक राहत नाही. फक्त आनंद आणि परमानंदच तेवढा बाकी राहतो. किशोरी आमोणकर यांनी गायलेला हा बहिणाबाई यांचा अत्यंत श्रवणीय अभंग अवश्य ऐका-

**अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग।**
**नाही भेदाचे ते काम पळोनि गेले क्रोध, काम।**
**देही असोनि विदेही सदा समाधिस्थ राही।**
**अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग।।**

हरीचा अर्थात ईश्वराचा रंग एकदा का लागला की मग

मनावरचा सर्व ताण निघून जातो, चिंता नष्ट होते, संसाराचे ओझे हलके होते. जीवन एक खेळ आहे असे वाटू लागते व तो खेळ खेळतांना अजिबात दमछाक होत नाही. प्रत्येक नव्या डावात तोच पहिला उत्साह कायम राहतो. रोम-रोमात प्रभुप्रेम रस भरून उरतो. योग हा एक रस आहे म्हणून योगबलाने नव सृष्टीचे सृजन केले जाते. थोडी मेहनत तर जरूर आहे. ती करावीच लागते. कुणीतरी दधीचि होतो, म्हणून त्यांनी आपली हाडे विश्वकल्याणार्थ दान केली, वृत्रासूराचा पराभव करण्यासाठी. विश्वशांतीच्या यज्ञात कुणाला तरी बलिदान हे द्यावेच लागते. बलिदान म्हणजे लोक कल्याणार्थ सर्वस्वाचा त्याग, सेवेसाठी झिजणे होय. **तात्पर्य म्हणजे सेवा व योगाभ्यास हे मुख्य दोन बल आहेत. याद्वारेच आपण आपल्या सद्‌गतीसाठी सिद्ध होत असतो.**

ज्याप्रमाणे वृक्षाचे मूळ हे जमिनीतून अन्नरस घेते, पाने ही अन्न तयार करतात, खोड त्याला आधार देते, साल ही बाह्यतः वृक्षाचे रक्षण करते, फळे ही प्राणिमात्राची क्षुधा शमवितात व बिया पुनरूत्पादनात उपयोगी पडतात. वृक्षाचे विविध अवयव हे एकाच वृक्षाची आपापल्या परीने सेवा करतात त्याप्रमाणे सर्व धर्म हे एकाच माणुसकीच्या पोषणासाठी आहेत हे प्रत्येकाने जाणून घेतले पाहिजे व एकमेकांचा आदर सन्मान केला पाहिजे. अहो, **अध्यात्म म्हणजे एका परमेश्वराचा सन्मान करणे होय, रचयिता आणि त्याच्या सुंदर, उत्कृष्ठ रचनेचा आदर करणे होय. उपासना पद्धती व मान्यता वेगवेगळ्या असू शकतात पण माणुसकी हे सर्वमान्य सूत्र आहे. हे नाकारून चालणार नाही.** माणसे जोडली जावीत. प्रत्येकाने एक दुसऱ्यावर प्रेम करावे. केवळ माणूस नव्हे तर चांगला माणूस म्हणून जगावे. एक निर्मात्याला स्मरावे. One God One World! सर्वांचे कल्याण साधावे हीच खरी उपासना होय. मानवतेचा आदर हीच खरी साधना होय. Respect to Humanity is Respect to God! Service of Mankind is Service of God! समतेची पूजा देवाला आवडते. सत्याची कास धरली असता कुणाही आत्म्याचा उद्धार होतो. इतरांचे दुःख पाहून ज्या हृदयात करुणेचा पूर येतो ते हृदय देखील ईश्वराला आवडते. भवतापापासून इतरांना सोडविण्याचे काम करणाऱ्यांवर ईश्वर प्रसन्न होतो. ज्ञानाचा सुगंध पसरविणारे सेवाधारी पाहून ज्ञानसागर ज्ञानदाता शिवपरमात्मा खुष होतो. कोण्या एका कविची रचना मोठी मार्मिक आहे. ते म्हणतात -

**“क्या बनाने आए थे और हम क्या बना बैठे ? कही मंदीर, कही मस्जिद, कही गिरीजा, कही गुरुद्वारा बना बैठे। क्या बनाने आए थे और हम क्या बना बैठे ? अरे हमसे तो जात अच्छी है परिंदोकी, कभी मंदीर जा बैठे कभी मस्जिद जा बैठे। क्या बनाने आए थे और हम क्या बना बैठे ?”**

आपले बहिरंग वेगळे दिसत असले तरी अंतरंग मात्र एकसमान आहे. आपले सर्वांचे अंतरंग अगदी सारखे आहे म्हणूनच ज्या गोष्टी आपल्याला पटतात त्या आपण स्वीकारल्या पाहिजेत. प्रेमभाव विकसित केला पाहिजे. सदैव लक्षात ठेवले पाहिजे की आपण सर्वजण एक परमात्मा शिवपित्याची मुले आहोत. फलस्वरूप हे अवघे विश्व एकतेच्या धाग्याने आपोआप घट्ट बांधले जाईल. या अनुषंगाने पुढील गीत अतिशय उद्‌बोधक आहे -

**सबका मालिक एक है, फिर क्यूँ बटा हुआ संसार है।**
**सच पूछो तो सारी दुनिया, अपनाही घर-बार है।।**

## हीच सणाची रीत खरी

हीच सणाची रीत खरी, दिवाळी करावी अशी साजरी।। धृ. ।।
विझणाऱ्या पणत्यांनी करिशी, दीपोत्सव साजरा।
आज चेतवी आत्मा दीपक, कधीच न विझणारा।
जीवन उजळूनी घे सत्वरी, दिवाळी करावी अशी साजरी।। १ ।।
घाण घरातील, तिमिर मनातील, दूर करण्या सारे।
इमारतीसह तना, मनाच्या, उघडी खिडक्या दारे।
तरीच लक्ष्मी येईल घरी, दिवाळी करावी अशी साजरी।। २ ।।
नष्ट करावी आता सारी, दुष्कर्मांची खाती।
भाऊबीजेला विजयी तिलक, लावी भगिनी हाती।
सौभाग्यशाली भाळावरी, दिवाळी करावी अशी साजरी।। ३ ।।
दैवी गुणांचे आभूषण हे, सर्वांगावर ल्यावे।
पक्वान्नाहूनी मधाळ वाणी, मधुर मनही व्हावे।
हेच विसरला आजवरी, दिवाळी करावी अशी साजरी।। ४ ।।

*(संदर्भ : ब्र.कु. गौतम सुत्रावे रचित काव्यसंग्रह)*

# संगमयुगी विद्यार्थ्यांचे अलौकिक मार्क्स्

अमृतवेळेचे गीत ऐकूनी, तुम्हा सोबत जागी होते वसुंधरा
बापदादांना शुभप्रभात म्हणूनी पहिला मार्क जमा करा ।।
बाबा बाबाचा निरंतर गजर असावा, आपुल्या अंतर्मनी
मार्कस् वाढविण्या, योगसाधना सफल करावी प्रतिदिनी ।।
शिवबाबांची मुरली श्रवण करण्या, उपस्थित व्हावे वेळेवरी
थोडाही विलंब केल्यास, अलौकिक मार्क्स् कमी होतील सत्वरी ।।
रुहानी वर्गात प्रवेश करण्या, क्षणभरी थांबावे प्रवेशद्वारी
रुहानी टीचरच्या अनुमतीनेच, प्रवेश करावा त्या ज्ञानमंदिरी ।।
स्वतःला आत्मा समजूनी, जे आत्मे मुरली श्रवण करतील
त्यांना रुहानियतचे अधिक मार्क्स्, रुहानी टीचर देतील ।।
अलौकिक प्राप्तींची ही मुरली, बाबा ऐकवितात ज्ञानमंदिरी
निद्राधीन झालात तर, ते स्वर कसे घुमतील हृदयमंदिरी ।।
ज्ञानरसात सारा वर्ग मग्न असता, मोबाईल वाजे अवेळी
अमृतपान ते खंडित करूनी, जावे लागते त्याचवेळी ।।
मुरलीतूनी बाबा वर्षाव करतात, स्वमान व वरदानांचा
त्या अमूल्य वेळी, अन्य कोणताही विचार नसावा आप्तजनांचा ।।
ब्रह्मावत्सांचा गणवेष असे, बॅजसहित सफेद रंगाचा
त्याचेही मार्क्स् जमा होण्या, पोशाख नको अन्य रंगाचा ।।
निमित्त टीचरच्या आत्मिक दृष्टीचा, योगसाधनेत स्विकार करावा
योगाचेही मार्क्स् वाढण्या, खुल्या नेत्रांनी सहज योग साधावा ।।
संकल्पांच्या ट्रॅफिकला प्रतिरोध करूनी
एक बाबाचा संकल्प धरावा
सात गीतांच्या आधारे दिवसाचा कर्मयोग सफल करावा ।।
श्रीमतात मनमताची भेसळ करूनी, मार्क्स् करू नयेत कमी
केवळ श्रीमताद्वारे, देवी-देवता बनण्याची संधी आहे नामी ।।
एक-एक मार्क कमी होता-होता, प्रारब्धही कमी होत जाते
संगमयुगातील प्रत्येक सेकंदाचे महत्व, अनन्य असते ।।
आत्मिक दृष्टीने पहाल तर, मार्क्स् जमा होतील आपुल्या खात्यात
दैहिक व विकारी दृष्टीने पहाल तर, याल तुम्ही गोत्यात ।।
व्यर्थ बोल व व्यर्थ संकल्प करतील तुमचे मार्क्स् मायनस
समर्थ बोल व समर्थ संकल्पांद्वारे मार्क्स् करावेत प्लस ।।

मनसा, वाचा, कर्मणा सेवा करूनी, श्रेष्ठ भाग्याची माराल बाजी
तर शिवबाबाही फुल मार्क्स् व वरसा देण्यास होतील राजी ।।
वाह बाबा वाह, वाह मै आत्मा वाह म्हणूनी मार्क्स् जमा करावेत
हाय हाय शब्दोच्चार केल्यास, वजा मार्क्स् गृहीत धरावेत ।।
संगमयुगात सर्वांना दुवा द्याव्यात व सर्वांच्या दुवा घ्याव्यात
ज्ञानी अज्ञानी, समस्त आत्म्यांच्या दुवा जमा करून ठेवाव्यात ।।
पाच स्वरुपांचा अभ्यास करूनी, संकल्प शक्तिशाली करावेत
पुण्यकर्मांच्या झोळीत, भरता येतील तितुके मार्क्स् भरावेत ।।
नव्वद टक्क्यांपेक्षाही, अधिक मार्क्स् हवे असतील तुम्हाला
तर मास्टर दुखहर्ता सुखकर्ता होऊनी सुखी करा प्रत्येकाला ।।
बापदादांना भोग लावूनी, जो आत्मा योगयुक्त भोजन घेईल
त्या अधिक मार्कांची पुण्याई अंतसमयी त्याच्या कामी येईल ।।
पुरुषार्थाचा चार्ट आपुला, रोज रात्रीला ठेवावा भरूनी
उत्तमोत्तम मार्क्स् प्राप्त करावेत, विशेष पुरुषार्थ करूनी ।।
निद्राधीन होण्याआधी, प्रिय बापदादांना गुडनाईट करावे
अंतिम मार्क जमा करूनी त्यांच्याच कुशीत निद्रिस्त व्हावे ।।
निजधामी प्रस्थान करण्यापूर्व संचित वाढवावे मार्कांचे
केवळ ब्रह्माबाबांनीच लक्ष्य गाठले शंभर मार्कांचे ।।
आपणा सर्वांनाच मार्क्स् जमा योजना राबवायची आहे
पास विथ ऑनर होऊनी, बापसमान बनावयाचे आहे ।।
कविता लेख व स्वानुभव आपुले पाठवावेत अमृतकुंभला
वाचकांच्या दुवा घ्याल तर त्याचेही मार्क्स् मिळतील तुम्हाला ।।
टक्केवारी मार्कांची कमी झाल्यास वाचन या काव्याचे करावे
संगमयुगी विद्यार्थ्यांनी दैवी डिग्रीचे सर्वोच्च शिखर गाठावे ।।
अन्य आत्म्यांना आपसमान बनवूनी मार्कांची लयलुट करावी
परमशिक्षक व त्याच्या ज्ञानाची स्मृती मात्र निरंतर असावी ।।
याची स्मृतीगंधासंगे अशरीरी बनूनी जावे आपुल्या परमधामी
अशरीरी स्थिती ही आपुली महाविनाशातही येईल कामी ।।
संगमयुगी पुरुषार्थाने सत्ययुगी प्रारब्ध घडत असते
दैवी स्वराज्याप्रती देवात्म्यांना मात्र काहीच कल्पना नसते ।।

*ब्र. कु. उज्ज्वलाताई, पुणे.*

# पाना था सो पा लिया...



(अनुभव) *ब्र.कु.राजूभाई, अनाज विभाग (आबू पर्वत).*

माझा जन्म आसाममधील एका खेडेगावात झाला. मी १२ वर्षाचा असताना माझे वडील व्यवसायासाठी मेघालय मध्ये निघून गेले. घरात मीच मोठा असल्याने घराची जबाबदारी माझ्यावर पडली. त्यामुळे अल्पकाळात काहीतरी कला आत्मसात करावी असे मला वाटू लागले. त्यामुळे मी भिन्न-भिन्न आसन क्रिया, तबला वादन, जादुचे प्रयोग करायला शिकलो. दहावी पर्यंत मी त्या कलांमध्ये पारंगत झालो व पुढे मला स्टेज शो करायला संधी मिळत गेली परंतु घरची परिस्थिती गरीबीची असल्याने मला काहीतरी व्यवसाय करणे आवश्यक होते. म्हणून मला कॉलेजमध्ये शिक्षण घेता आले नाही तरी मी शिक्षणाची जिद्द सोडली नाही. सकाळ-संध्याकाळ ट्यूशन्स घेऊन बाकी उरलेल्या वेळेत मी अभ्यास करत गेलो आणि बाहेरून परीक्षा देऊन बी.ए. पर्यंत शिकलो. यानंतर देखील कुठे नोकरी मिळाली नाही त्यामुळे जीवनाविषयी वैराग्य वाटू लागले. एवढी मेहनत करून शिक्षण घेतले पण त्याचा पुढे काहीच फायदा नाही, हे लक्षात आल्यावर जीवनात नैराश्य वाटू लागले.

## ❒ जीवनात आशेचा किरण दिसला

एकदा मला उमाचल येथील योगकेंद्राद्वारे आसन क्रिया करून दाखविण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. त्यानंतर त्या कार्यक्रमाचे प्रसारण टी.व्ही. वर होणार होते म्हणून मी मोठ्या आनंदाने तिकडे चाललो होतो. रस्त्यात एका मंदिरासमोर एक प्रदर्शन आयोजित केले होते. बरीच गर्दी होती म्हणून मीसुद्धा तेथे गेलो. त्या प्रदर्शनाचे नाव होते 'विश्व नवनिर्माण आध्यात्मिक प्रदर्शन'. ते नाव वाचून, त्यातील चित्र बघाविशी वाटली. सुरूवातीला मी आत्मा व परमात्म्याचे चित्र पाहिले **परंतु नंतर मी जेव्हा त्रिमूर्तीच्या चित्रासमोर उभा राहिलो तेव्हा त्यातील ब्रह्माबाबांना आपण ओळखतो असे वाटू लागले. त्यांना आपण कुठेतरी भेटलो आहोत, असा विचार मनात सारखा येत होता पण नेमके कुठे व कधी भेटलो आहोत, हे मात्र लक्षात येत नव्हते.** मी सगळे प्रदर्शन ओझरते पाहिले. दुसऱ्या दिवशी परत तेथे गेलो व तेथून सहज राजयोग हे पुस्तक खरेदी केले. ते वाचून मला खूप चांगले वाटले. सहज राजयोगाद्वारेच आपले जीवन महान देवतातुल्य बनू शकते. हे लक्षात आल्याने जीवनात नवीन आशेचा किरण दिसू लागला. परंतु त्याठिकाणी ब्रह्माकुमारीज्‌चे सेवाकेंद्र नसल्याने मला ईश्वरी ज्ञानाचा अधिक लाभ घेता आला नाही तरी आध्यात्मिक ज्ञानाची जिज्ञासा मात्र निर्माण झाली.

## ❒ गीता शास्त्राचे अध्ययन

कुठेतरी असे वाचले होते की गीता हेच सर्वोत्तम शास्त्र आहे त्यात भगवंताची डायरेक्ट महावाक्ये आहेत. त्यामुळे मी रोज एका बंद खोलीत बसून गीता वाचू लागलो. गीतेत जेव्हा मी हे वाचले की जो साधक आपल्या कर्मेंद्रियांना जिंकून परमेश्वराच्या आठवणीत शरीर सोडतो तो आत्मा परमात्म्यात लीन होतो. तेव्हा मीसुद्धा असे ठरवले की या जन्मात जीवापाड मेहनत करून कुठल्याही परिस्थितीत परमात्म्यात लीन व्हायचे. **त्यासाठी मी निरनिराळ्या हठयोगाच्या क्रिया करू लागलो. पुढे मला असा अनुभव येऊ लागला की डोळे बंद करताच, मनःचक्षूंनी मी आत्मा तारांगणात उडत आहे. ताऱ्यांना स्पष्ट पहात आहे. यातून मला खूप आनंद होऊ लागला.** फलस्वरूप मला एकांत चांगला वाटू लागला. त्यामुळे मी पिक्चर बघणे सोडून दिले. पिक्चरची गाणी ऐकणे बंद केले. घरातील सर्वांपासून तसेच मित्रमंडळींपासून अलिप्त राहू लागलो. मी मिताहारी बनलो. दोन दिवसानंतर उपवास करू लागलो. दिवसेंदिवस शरीर कमजोर होत गेले. परंतु मला मात्र मरणाची भिती नव्हती कारण मला लवकरात लवकर शरीराचा त्याग करून परमात्म्यात लीन व्हायचे होते. त्यामुळे मी जंगलात जाऊन एकांतात तासन्‌तास साधना करू लागलो. मला जंगलातील सापांची देखील भीती वाटेनाशी झाली होती कारण अंतिम समयी मला फक्त एक परमेश्वराची आठवण रहावी एवढीच माझी इच्छा होती. परंतु माझ्या मनात एक

संभ्रम अवश्य होता की परमेश्वराचे नेमके स्वरूप काय आहे?

## ❒ गीता अध्ययनानंतरही ईश्वराच्या स्वरूपाविषयी संभ्रम

मी डोळे बंद करताच आकाशात उडू शकत होतो परंतु आत्मा व परमात्म्याला मात्र जाणत नव्हतो. त्यासाठी मी गीतेचे सखोल अध्ययन करीत होतो. **गीतेत एका ठिकाणी भगवंताने असे म्हटले आहे की ज्याचा जो उपासक असेल त्यालाच तो प्राप्त होतो. तो मला प्राप्त होत नाही. कोट्यावधी आत्म्यांमध्ये विरळाच कोणी मला यथार्थ जाणतो**. तेव्हा मी असा निश्चय केला की मला इतर कुणाचा उपासक न बनता, केवळ भगवंतालाच प्राप्त करायचे आहे. त्यासाठी सर्वप्रथम भगवंताला जाणणे आवश्यक आहे. गीतेच्या दहाव्या अध्यायात भगवंताच्या स्वरूपाविषयी चर्चा केली आहे. त्यात म्हटले आहे की वेदांमध्ये सामवेद मी आहे, देवतांमध्ये इंद्र मी आहे, इंद्रियांमध्ये मी मन आहे आणि जीवांमध्ये असणारी चेतना (आत्मा) मी आहे. सर्व रुद्रांमध्ये शंकर मी आहे, पुरोहितांमध्ये मुख्य जो बृहस्पति तो मी आहे. तसेच चौथ्या अध्यायात असेही म्हटले आहे की जेव्हा-जेव्हा धर्माची ग्लानी होते तेव्हा-तेव्हा मी अवतरित होतो. गीतेतील या सर्व गोष्टी वाचल्यानंतर मी संभ्रमात पडलो की भगवंताचे नेमके स्वरूप ते कोणते? श्रीकृष्ण तर डोळ्यांना दिसतो. मग या चर्मचक्षूंनी न दिसणारे भगवंताचे स्वरूप कोणते? तो जर सर्वव्यापी आहे तर त्याची उपासना करण्याची गरज काय? असे अनेक प्रश्न मनात येत असत. कधी कधी तर मी रात्री शिवमंदिरात जात असे. शिवलिंगावर डोके ठेवून मन शांत करण्याचा प्रयत्न करीत असे. तसेच भगवंताची विनवणी करीत असे की मला तुझा सत्य परिचय दे म्हणजे मी तुझे ध्यान करू शकेन. त्यासाठी मी नवदीप (इस्कॉन मुख्यालय) कन्याकुमारी, रामेश्वरम् इत्यादी अनेक तीर्थक्षेत्रांवर गेलो. निरनिराळ्या आश्रमांवर गेलो. तेथील साधुसंतांना भेटलो. परंतु माझ्या प्रश्नाचे उत्तर मला कुठेच मिळाले नाही. शेवटी मी घरी परत आलो तेव्हा मनात एक विचार आला की एकदा ब्रह्माकुमारी आश्रमात जाऊन आपण पाहू या.

## ❒ ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्रावर सत्य ज्ञानाची प्राप्ती

काही दिवसानंतर मला तेजपूर येथे एका मित्राच्या लग्नासाठी जाण्याचा योग आला. तेथे ब्रह्माकुमारी आश्रम असल्याचे कळले तेव्हा मला अतिशय आनंद झाला. तेजपूरला गेल्यावर आश्रम शोधत-शोधत दुपारी १ वाजता मी तेथे पोहोचलो. तेथील शांत व शुद्ध वातावरणाने मनाला मोहित केले. तेथे गायत्री बहेनजी मला भेटल्या. त्यांना मी येथे येण्याचे माझे लक्ष्य सांगितले की मला परमेश्वराला भेटायचे आहे. त्यासाठी मला घर सोडून येथे रहायची इच्छा आहे. तेव्हा बहेनजी म्हणाल्या की तुम्हाला घर सोडायचे नाही तर घरी राहूनच शिवबाबांची आठवण करायची आहे. त्यानंतर बहेनजींनी मला क्लासरूम दाखवले. तेथे एक ब्रह्माबाबांचा मोठा फोटो होता. तो पाहून मला असे वाटले की आजवर मी स्वप्नाच्या दुनियेत भटकत होतो. ज्या फोटोला पाहून माझ्यात आध्यात्मिकतेची प्रेरणा जागृत झाली होती, त्याचा मला विसर पडला होता. गायत्री बहेनजींनी मला तेजपूर पासून जवळच असलेल्या एका गीतापाठशाळेचा पत्ता दिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी तेथे गेलो व तेथे एका घरात छोट्याशा खोलीत लाल प्रकाश दिसला. मी त्या प्रकाशाकडे आपोआपच आकर्षित झालो व आत खोलीत जाऊन बसलो. **तेथे बसताच एका क्षणात मी मन-बुद्धीने वतनमध्ये उडालो व सफेद किरणांच्या मध्ये प्रकाशाचे शरीरधारी ब्रह्माबाबा प्रसन्न मुद्रेने मला भेटत असल्याचा साक्षात्कार झाला. त्यावेळी मी जणू आनंदाच्या सागरी सामावून गेलो होतो. ब्रह्माबाबा मला दृष्टी देत होते, ज्यात शांती, प्रेम व अतिंद्रिय सुख सामावलेले होते**. मला वेळेचे भानही नव्हते परंतु जेव्हा मी त्या अवस्थेतून खाली आलो तेव्हा एक बहीण मला बोलवत होती. त्या बहिणीला मात्र कल्पना नव्हती की मला कोणती प्राप्ती झाली होती. त्यानंतर तेथे मी साप्ताहिक कोर्स पूर्ण केला परंतु आत्मा व परमात्म्याचा सत्य परिचय प्राप्त करणे एवढाच माझा उद्देश होता. बाकी ज्ञानाकडे मी फारसे लक्ष देत नव्हतो. मला केवळ साधना करण्यासाठी योग्य स्थान हवे होते. ते मला मिळाले होते. परमात्म्याच्या आठवणीत शरीर सोडणे व त्यात लीन होणे हाच माझ्या जीवनाचा उद्देश होता.

### ❒ मुरलीने मला मरणापासून वाचवले

साप्ताहिक कोर्स केल्यानंतर मी मुरली क्लासला येत असे परंतु डोळे बंद करून ध्यान करीत असे. एके दिवशी मुरलीतील पुढील महावाक्ये माझ्या कानावर पडली 'तुम्हाला येथे काहीच सोडायची गरज नाही. संन्यासी लोक घर-दार सोडतात. परंतु देह व देहाची दुनिया सोडू शकत नाहीत. तुम्ही तर घरात राहून आत्मअभिमानी बनता, देह व देहाची दुनिया विसरता हाच बेहदचा संन्यास आहे. यालाच 'जीते जी मरना' असे म्हटले जाते. मला यथार्थ न जाणल्याने माझ्याविषयी अनेक प्रकारची मनुष्य मते आहेत. कोणी म्हणतो मी युगे-युगे येतो, कोणी म्हणतो मी २४ अवतार घेतो; कोणी म्हणतो मी सर्वव्यापी आहे. आता मुलांनो, तुम्ही जज करा. मी जर युगे-युगे येत असतो तर चार युगात माझे चारच अवतार हवे होते. तसेच मी जर सर्वव्यापी आहे तर अवतार घेण्यासाठी मी येऊ कुठून?' मुरलीतील ही महावाक्ये ऐकताच माझ्या मनाची कवाडे उघडली व मला असा अनुभव आला की स्वयं परमात्मा पित्याच्या रूपाने माझ्यासमोर बसून मला समजावित आहे. तेव्हा माझ्या लक्षात आले की परमात्म ज्ञानावाचून, शरीर सोडल्याने परमात्म्याशी मीलन शक्य नाही. त्यामुळे मी शरीर सोडण्याच्या विचाराचा त्याग केला. अशाप्रकारे ईश्वरी ज्ञानमुरलीच्या श्रवणाने मला जीवनदान प्राप्त झाले.

त्यानंतर मी अतिशय लक्षपूर्वक मुरली श्रवण करू लागलो तसेच मुरलीतील ज्ञानावर मनन-चिंतन करू लागलो. **फलस्वरूप मला तीन लोकांचे, तिन्ही काळांचे संपूर्ण सत्य ज्ञान प्राप्त झाले. तसेच हेही माझ्या लक्षात आले की मुरलीतील महावाक्ये ही स्वयं निराकार शिव परमात्म्याने ब्रह्मामुखकमलाद्वारे उच्चारण केली आहेत त्यामुळे हेच सत्य गीता ज्ञान आहे. आजवर मी जे गीताशास्त्र अध्ययन करीत होतो ते तर रुपकात्मक व अयथार्थ आहे. त्यात कालपरत्वे अनेक बदल होत गेले आहेत. त्यामुळे त्यातून परमात्म्याचा सत्य परिचय प्राप्त होत नाही.** माझ्या परिवारातील सर्व सदस्यांनी देखील ईश्वरी ज्ञानाचा साप्ताहिक कोर्स केला. फलस्वरूप त्यांचा तामसिक आहार व व्यवहार, आपसातील भांडण-तंटे या सर्व गोष्टी सहजच समाप्त झाल्या. बघता-बघता घरातील वातावरण बदलून गेले. सर्वजण मोठ्या आनंदात व गुण्यागोविंदाने राहू लागले. माझ्या लहान भावाला मी छोटेसे दुकान टाकून दिले. त्यामुळे एका वर्षात आमच्या घरची गरिबी दूर झाली. झोपडीचे परिवर्तन पक्क्या घरात झाले. बघता-बघता आमचा सारा संसार बदलला.

### ❒ याचि देही, याचि डोळा, पाहिला म्या शिव भोळा

ईश्वरी ज्ञान प्राप्त केल्यानंतर, सन १९९६ मध्ये मी पहिल्यांदा माउंट आबू येथे परमात्म मीलनासाठी गेलो. त्यावेळेचा माझा आनंद खरोखर अवर्णनीय असा होता. **मधुबनचे पवित्र वातावरण, तेथील निःस्वार्थ स्नेह, तेथील सेवाभाव, तेथील स्वच्छता या सर्व गोष्टींनी मला इतके आकर्षित केले की मधुबन म्हणजे जणू या सृष्टीवरील स्वर्ग अनुभवास आला. शिवबाबांची मुरली सन्मुख ऐकताना असा अनुभव आला की मी अति सूक्ष्म ज्योतिर्बिंदू आत्मा, परमधाममध्ये परमात्मा शिव पित्याकडून पुत्ररूपाने ज्ञान ग्रहण करीत आहे.** मला परम सुख, शांती, आनंद, प्रेम, शक्ती यांची प्राप्ती होत आहे. त्यावेळी माझ्या मनात एकच संकल्प होता की आता येथेच रहावे. येथून घरी परत जाऊच नये. अंतर्यामी शिवबाबांनी माझी ही मनोकामना सन २००१ मध्ये पूर्ण केली. आज मी मधुबनमध्ये समर्पित होऊन धान्य (अनाज) विभागात सेवा करीत आहे. खरोखर या भाग्याची महिमा कशी व किती वर्णावी! येथे डायरेक्ट परमात्म पालना आम्हा मधुबन निवासींना प्राप्त आहे. अमृतवेळेपासून रात्रीपर्यंत महान तपस्वी आत्म्यांच्या सहवासाने, त्यांच्या अनुभवाने सदैव आत्मोन्नती होत आहे. माझ्यावर जणू परमात्म वरदानांची वर्षा होत आहे. एकेकाळी मनाला शांती मिळावी म्हणून रात्री उठून मी शिवलिंगावर डोके ठेवण्यासाठी मंदिरात जात असे. परंतु आता प्रत्यक्ष भोलेनाथ शिवबाबांच्या कुशीत परमधाममध्ये विश्राम करीत आहे. **अखेर परमात्मा शिव पिता मला भेटला. माझे जीवन धन्य धन्य झाले. आता फक्त एकच गीत हृदयात झंकारीत होत असते -**

**पाना था सो पा लिया।**
**पानेका ना कुछ रहा, जब तुझको पा लिया।**